cmyk

## संपादकीय

### पारदर्शकतेवरील प्रश्न : लोकशाहीतील उत्तरदायित्वाची कसोटी

कर्नाटकचे मंत्री प्रियांक खरगे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक मोहन भागवत यांना लिहिलेल्या खुल्या पत्रामुळे देशात नव्या राजकीय आणि वैचारिक चर्चेला सुरुवात झाली आहे. संघाच्या शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर लिहिलेल्या या पत्रात संघाची कायदेशीर स्थिती, आर्थिक व्यवहार, निधीचे स्रोत, करसंबंधी बाबी आणि सार्वजनिक उत्तरदायित्व याविषयी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या प्रश्नांमुळे केवळ राजकीय वाद निर्माण झाला नसून लोकशाही व्यवस्थेत प्रभावशाली संस्थांच्या पारदर्शकतेचा मुद्दाही केंद्रस्थानी आला आहे.

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–८८ | गुरूवार दि.१८ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# साखर उद्योगाच्या मागण्यांवर केंद्रात लवकरच सकारात्मक निर्णय

नवी दिल्ली । वृतसंस्था

**देशातील साखर उद्योग सध्या आर्थिक अडचणींचा सामना करत असताना उद्योगाला दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारकडून महत्त्वपूर्ण निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील साखर उद्योगाच्या शिष्टमंडळाने २७ मे रोजी विविध मागण्या सादर केल्या होत्या. या मागण्यांवर केंद्र सरकारच्या वरिष्ठ स्तरावर चर्चा सुरू असून, लवकरच उद्योगाच्या हिताचे सकारात्मक निर्णय जाहीर होतील, असा विश्वास राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केला.**

हर्षवर्धन पाटील यांनी ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाचे सचिव संजीव चोप्रा यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली. या बैठकीत साखर उद्योगासमोरील गंभीर प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. उद्योगाच्या मागण्यांवर त्वरीत निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त करताना पाटील यांनी



केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. यावेळी सचिव संजीव चोप्रा यांनीही उद्योगाच्या मागण्यांवर वरिष्ठ स्तरावर निर्णय प्रक्रिया सुरू असल्याची माहिती दिली. त्यामुळे साखर उद्योगाला अपेक्षित असलेले अनेक प्रश्न निकाली निघण्याची शक्यता निर्माण झाली आहे. साखरेच्या किमान विक्री किमतीत वाढीची मागणी हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, सध्या साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) प्रतिकिलो ३१ रुपये आहे. मात्र, मागील एमएसपी वाढीनंतर उसाच्या एफआरपीमध्ये सुमारे २९.५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### दुसऱ्या वनडेत शुभमन आणि इशानची शतकं

मुंबई: भारत विरुद्ध अफगाणिस्तानमध्ये आज दुसरा वनडे लखनऊतील या सामन्यामध्ये भारताचा कर्णधार शुबमन गिल याने शानदार खेळी करत शतक झळकावलं आहे. या सामन्यामध्ये शुबमनने अफगाणिस्तानच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेतला. त्याने १३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने ७७ चेंडूमध्ये शतक पूर्ण केले आहे. कर्णधार शुभमनला इशान किशनची दमदार साथ मिळाली. रोहित शर्मा आऊट झाल्यानंतर इशान किशनने मैदानावर येत गिलला उत्तम साथ दिली. या सामन्यात इशाननेही त्याचे शतक पूर्ण केले आहे. त्याने ७१ बॉलमध्ये १०३ धावा केल्या. यामध्ये १४ चौकार आणि ४ षटकार ठोकले.

### मिसिंग लिंकच्या ब्रिजवर ४ गाड्या एकमेकांना धडकल्या

मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाट येथील मिसिंग लिंकच्या पुणे लेनवरील केबल–स्टेड ब्रिजवर तीन वाहनांचा अपघात झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.द्रुतगती मार्गावरील बोरघाट येथील मिसिंग लिंकच्याब्रिजवर अपघात सुदैवाने या अपघातामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी वाहनांचे मात्र मोठे नुकसान झाले आहे.फॉर्च्युनर कारच्या चालकाने अचानक ब्रेक दाबून तिसऱ्या लेनमध्ये गाडी थांबवली. त्यामुळे मागून येणाऱ्या एका व्हेरना कारने फॉर्च्युनरला धडक दिली अपघाताची माहिती मिळताच, महामार्ग पोलीस, एम.एस.आर.डी.सी. कर्मचाऱ्यांसह तात्काळ घटनास्थळी पोहोचले. सुदैवाने दुर्घटनेत कोणीही जखमी झाले नाही, परंतु तिन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

### रवी राणांनी उद्धव ठाकरेंच्या जखमेवर मीठ चोळलं

यवतमाळ : एकनाथ शिंदे यांच्या 'ऑपरेशन टायगर'वर आमदार रवी राणा म्हणाले ' जैसी करणी वैसी भरणी ' ठाकरेंच्या फुटलेल्या सहा आमदारांनी गट स्थापन करून माझ्या युवा स्वाभिमान पार्टी यावं अशी खुली ऑफर दिली. ठाकरे गटात फक्त उद्धव ठाकरे आणि संजय राऊत राहणार आहेत. ठाकरे गट पूर्ण खाली होणार आहे. ठाकरेंचे आणखी दोन खासदार माझ्या संपर्कात असल्याचेही त्यांनी सांगितलं, असंही ते म्हणाले. ते मुख्यमंत्री असताना हनुमान चालीसा वाचली म्हणून नवनित राणा आणि मला १४ दिवस दिवस उद्धव ठाकरे यांनी जेलमध्ये टाकलं. असं म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंच्या जखमेवर मीठ चोळलं. दरम्यान, पक्षांतर बंदीच्या कायद्यानुसार, दोन तृतीयांश खासदार कुठल्या मुळे या गटातील खासदारांवर कोणतेही कारवाई होऊ शकत नाही .

## भाजपच्या साथीने शिंदेंचे ऑपरेशन टायगर यशस्वी

# ठाकरे नंतर पवारांच्या राष्ट्रवादीची धाकधूक वाढली

मुंबई । प्रतिनिधी

**एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे सहा खासदार फोडून बहुचर्चित ऑपरेशन टायगर अखेर यशस्वी करुन दाखवले आहे. ठाकरे गटाच्या सहा बंडखोर खासदारांनी बुधवारी नवी दिल्लीतील लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला यांच्या कार्यालयात जाऊन स्वतंत्र गटाची नोंदणी केली. लोकसभा अध्यक्षांनी या सहा बंडखोरांच्या गटाला मंजुरी दिली आहे.या घटनेने चांगलीच खळबळ उडालेली असताना शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने चांगलीच धास्ती घेतल्याचे समजते त्यांनी आपल्या सर्वच लोकप्रतिनिधींची बैठक बोलावल्याचे समजते.**



शिवसेना उद्धव ठाकरे यांचा हा गट आता लवकरच एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीन होणार आहे. येत्या १९ जून रोजी मुंबईत होणा–या वर्धापनदिन सोहळ्यात ठाकरे गटाचे सहा बंडखोर खासदार शिंदे सेनेत प्रवेश करणार आहेत. यामध्ये संजय जाधव, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर, ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे आणि खासदार संजय दिना पाटील यांचा समावेश आहे.शिंदे गटाने ऑपरेशन टायगर यशस्वी करुन दाखवल्यामुळे ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. एकनाथ शिंदे यांनी दुसऱ्यांदा शिवसेना खिळखिळी केल्यामुळे ठाकरे गटाच्या भविष्यातील अस्तित्त्वाबद्दलच अनेक शंका उपस्थित झाल्या आहेत. ठाकरे गटाचे खासदार फुटल्यानंतर आता आमदार आणि नगरसेवकही उद्धव ठाकरे यांची साथ सोडून जातील, अशी चर्चा सुरु झाली आहे. शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी तुमचे मुंबईतील ६५ खासदार तुमच्याकडे राहतात का बघा, असा गर्भित इशाराच देऊन टाकला आहे. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात ठाकरे गटाचे आमदारही ▶▶ पान २ वर

# तारीख पे तारीखचा खेळखंडोबा सुरुच

## आता पुन्हा ठाकरे विरुद्ध शिंदे कायदेशीर लढाई

मुंबई । प्रतिनिधी


महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठी खळबळ उडाली असून एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे गटाच्या ६ खासदारांना आपल्या गोटात सामील करून राज्यात खळबळ उडवून दिली असली तरी या पूर्वीचाच निकाल प्रलंबित असताना आणि तारीख पे तारीख सुरूच आहे आता पुन्हा एकदा कायदेशीर लढाईला सामोरे जावे लागणार आहे.

असीम सरोदे यांनी सांगितले की, पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे यांना त्यांच्या पक्षातील खासदार आणि आमदारांची बैठक बोलवण्याचा आणि त्यासाठी 'व्हिप' (पक्षादेश) जारी करण्याचा पूर्ण कायदेशीर अधिकार आहे. सरोदे म्हणाले, "उद्धव ठाकरेंनी काढलेला व्हिप हा संविधानाच्या १०व्या परिशिष्टानुसार (पक्षांतरबंदी कायदा) एक कायदेशीर आदेश आहे. पक्षशिस्त पाळण्यासाठी संबंधित लोकप्रतिनिधींनी या बैठकीला हजर राहणे बंधनकारक असते. जर हे खासदार ▶▶ पान २ वर

# स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी आज मतदान

धाराशिव । प्रतिनिधी

**धाराशिव–लातूर–बीड स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीसाठी गुरुवार दि. १८ जून रोजी मतदान होत आहे. यासाठी तीनही जिल्ह्यातील २९ तालुक्यातील २९ मतदान केंद्रावर निवडणूक विभागाकडून व्यवस्था करण्यात आली आहे. धाराशिव–लातूर–बीड स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीसाठी महाविकास आघाडी विरुध्द महायुती अशी दुरंगी लढत होत आहे. महायुतीकडून बसवराज पाटील तर महाविकास आघाडीकडून महेश देशमुख हे रिंगणात आहेत. २२ जूनला निकाल आहे.**



महायुतीमध्ये भाजपाचे उमेदवार माजी मंत्री बसवराज पाटील व महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवार महेश देशमुख हे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. विशेष म्हणजे दोन्ही उमेदवार धाराशिव जिल्ह्यातील असून उमरगा तालुक्यातील आहेत. दोघांमध्ये सरळ

- **लातूर; दहा तालुक्यात ३६७ मतदार**
- **बीड; ११ तालुक्यात ३०४ मतदार**
- **धाराशिव ; ८ तालुक्यात ३१७ मतदार**

लढत होत असल्याने सामना रंगतदार होत आहे. मतदान १८ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत होणार आहे. तर मतमोजणी २२ जून रोजी होणार आहे. मागील वर्षी १००५ मतदार होते. ▶▶ पान २ वर

# शंभर कोटीचा वाळू घोटाळा

## आ.पंडितांच्या तक्रारीनंतरही तहसीलदार सलामत

बीड । प्रतिनिधी

घरकुलधारकांना शासन निर्णयानुसार देण्यात येणाऱ्या मोफत पाच ब्रास वाळूचा अपहार करून महसूल प्रशासनाने कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार केला शासनाचा महसूल बुडवला शासनाची फसवणूक केली याप्रकरणी आमदार विजयसिंह पंडित यांनी रीतसर तक्रार करूनही तहसीलदार मात्र अधिकारी लॉबीमुळे सही सलामत राहिले आता थेट जिल्हाधिकाऱ्यांनाच याप्रकरणी आमदार महोदयांनी आरोपीच्या पिंजऱ्यात घेतले पाहिजे.



घरकुलधारकांना देण्यात येणाऱ्या पाच ब्रास वाळूचा अपहर करत ९० ते १०० कोटी रुपये कमावणाऱ्या गेवराई तालुक्यातील महसूल प्रशासनाचा पडदा फास्ट करण्याचे काम गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी केला होता त्यांनी यासंदर्भात रीतसर तक्रारी दिली होती मात्र काल करण्यात आलेल्या कारवाईमध्ये यातील प्रमुख असलेले तहसीलदार खोमणे यांचा मात्र आरोप पत्रामध्ये साधा उल्लेखही नाही चोर सोडून संन्याशाला फाशी ▶▶ पान २ वर

# नागपूरच्या रस्त्यावर कॉक्रोच एल्गार!

नागपूर । प्रतिनिधी

हजारो विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, हातात संविधानाच्या प्रती, शिक्षण वाचविण्याचे फलक, घोषणांचा प्रचंड गजर आणि 'चलो दिल्ली'च्या गर्जनांनी मंगळवारी संविधान चौक अक्षरश: दणाणून गेला. शिक्षणव्यवस्थेतील कथित गैरव्यवहार, 'नीट' आणि सीबीएसई परीक्षांतील गोंधळ, विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या आणि शिक्षणक्षेत्रातील धोरणांविरोधात विद्यार्थ्यांसह तरुणांनी तीव्र आक्रोश व्यक्त केला. या आंदोलनाचे नेतृत्व कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी केले.




देशातील विद्यार्थ्यांमध्ये व्यवस्था बदलण्याची ताकद आहे. ही चळवळ कोणत्याही एका व्यक्तीची नसून संपूर्ण देशातील विद्यार्थ्यांची आहे. आम्हाला शिक्षणव्यवस्थेसह देश बदलायचा आहे, असे प्रतिपादन करत दीपके यांनी केंद्र व राज्य सरकारवर निशाणा साधला. आंदोलनात ▶▶ पान २ वर

# उद्घाटनापुर्वीच कोट्यावधीच्या रुग्णालयाची 'पीओपी' कोसळली

## बीडमधील निकृष्ट कामामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप

बीड । प्रतिनिधी

कोट्यवधी रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या बीड येथील नवीन 'जिल्हा माता व बालसंगोपन रुग्णालय' इमारतीचा दर्जा उद्घाटनापूर्वीच चव्हाट्यावर आला आहे. काही दिवसांतच या देखण्या इमारतीचे लोकार्पण सोहळा पार पडणार असतानाच, इमारतीच्या छताचे पीओपी अचानक कोसळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पाण्याच्या नळांच्या गळतीमुळे ▶▶ पान २ वर




## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

**बीड, दि.१७ जून २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८७.०० क्विंटल | २,०८० | २,४९२ | २,२९७ |
| ज्वारी/हायब्रिड: २१६.०० क्विंटल | २,२०१ | ४,१०० | २,८३४ |
| मका/लोकल: २.५० क्विंटल | २,०३० | २,०३० | २,०३० |
| तूर : १.०० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ५३.५० क्विंटल | १,९२० | २,८०० | २,४१५ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: १२.०० क्विंटल | ५,२९२ | ५,६०० | ५,४४० |

# महाराष्ट्र बंगाल नंतर यूपीत भाजपचे ऑपरेशन लोटस

नवी दिल्ली । वृतसंस्था

**शिवसेनेत दुसऱ्यांदा फूट पडल्यानंतर, तृणमूल काँग्रेस दुभंगल्यानंतर आता विरोधी बाकांवरील आणखी एक मोठा पक्ष फुटण्याची शक्यता आहे. गेल्या तीन महिन्यांत तीन पक्षांमध्ये फूट पडली आहे. आप, तृणमूल काँग्रेस यांच्या पाठोपाठ ठाकरेसेनेत भूकंप झाला आहे. ठाकरेंच्या पक्षात ४ वर्षांत दुसऱ्यांदा फूट पडली आहे.आता यूपीत भाजपचे ऑपरेशन टायगर राबवले जाणार आहे सभागृहात बहुमतासाठी हा खटाटोप असला तरी बहुमत कोणत्या निर्णयासाठी पाहिजे हे मात्र गुलदस्त्यात आहे.**







मागील ४ वर्षांत देशात पक्षफुटीची मालिकाच पाहायला मिळत आहे. शिवसेनेच्या फुटीपासून या सगळ्याला सुरुवात झाली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस, आप, तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली. विशेष म्हणजे या पक्षातील फुटिर गट, खासदारांचा कंपू भाजप सोबत गेला. काही थेट भाजपमध्ये सहभागी झाले. यानंतर आता आणखी एक मोठा पक्ष फुटणार असल्याचा दावा उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते केशव प्रसाद मौर्य यांनी केला आहे. ते कानपूरमध्ये माध्यमांशी बोलत होते.समाजवादी पक्षाचे २५ ते २६ खासदार पक्षांतरासाठी आणि पक्ष फोडण्यासाठी पूर्णपणे तयार आहेत, असा दावा करत मौर्य यांनी तृणमूल काँग्रेस आणि शिवसेना यांच्यात पडलेल्या फुटीचं उदाहरण दिलं. भाजप त्यांच्या पक्षाला फोडत नाहीए. पण २०२७च्या विधानसभा निवडणुकीआधी त्यांचे नेतेच स्वत:हून आमच्याकडे चालत येतील, असा दावा त्यांनी केला.२०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला उत्तर प्रदेशात ३३ जागा मिळाल्या होत्या. तर समाजवादी पक्षानं ३७ जागांवर यश मिळवलं होतं. २०१९ च्या तुलनेत भाजपच्या २८ जागा घटल्या, तर समाजवादी पक्षाच्या ३२ जागा वाढल्या होत्या. समाजवादी ▶▶ पान २ वर

## राज्यात पावसाची प्रतीक्षा अद्यापही कायम

मुंबई । प्रतिनिधी

**पश्चिम भारतात मान्सूनची वाटचाल संथ गतीने होत असल्याने, मुंबईत नैऋत्य मोसमी पावसाच्या आगमनासाठीची प्रतीक्षा आणखी लांबणार आहे. हवामान तज्ज्ञांनी पावसाच्या अपेक्षित आगमनाची तारीख पुन्हा एकदा पुढे ढकलली आहे.**

भारतीय हवामान विभागाने आता मुंबईत मान्सूनच्या आगमनासाठीची तारीख सुधारित केली असून, ती शहरात मान्सूनच्या सामान्य आगमनाच्या तारखेपेक्षा जवळपास दोन आठवडे उशिराची आहे. खासगी हवामान संस्था 'स्कायमेट'ने असे संकेत दिले आहेत की, जर सध्याची वातावरणीय स्थिती कायम राहिली, तर हा विलंब आणखी वाढू शकतो. आता २० जूननंतर पावसाच्या सरी बरसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.दक्षिण आणि पूर्व भारतातील काही भागांत ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# पारदर्शकतेवरील प्रश्न : लोकशाहीतील उत्तरदायित्वाची कसोटी

कर्नाटकचे मंत्री प्रियांक खरगे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) सरसंघचालक मोहन भागवत यांना लिहिलेल्या खुल्या पत्रामुळे देशात नव्या राजकीय आणि वैचारिक चर्चेला सुरुवात झाली आहे. संघाच्या शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर लिहिलेल्या या पत्रात संघाची कायदेशीर स्थिती, आर्थिक व्यवहार, निधीचे स्रोत, करसंबंधी बाबी आणि सार्वजनिक उत्तरदायित्व याविषयी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या प्रश्नांमुळे केवळ राजकीय वाद निर्माण झाला नसून लोकशाही व्यवस्थेत प्रभावशाली संस्थांच्या पारदर्शकतेचा मुद्दाही केंद्रस्थानी आला आहे.

आरएसएस ही भारतातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी आणि वैचारिक संघटनांपैकी एक मानली जाते. देशभरात हजारो शाखा, लाखो स्वयंसेवक आणि अनेक सामाजिक, शैक्षणिक व सेवा उपक्रमांद्वारे संघाचे व्यापक कार्य चालते. संघाच्या स्वतःच्या अहवालांनुसार त्याची संघटनात्मक व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे अशा मोठ्या प्रभाव असलेल्या संस्थेकडून सार्वजनिक उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे स्वाभाविक असल्याचे मत काही तज्ज्ञ व्यक्त करतात.

प्रियांक खरगे यांनी आपल्या पत्रात मुख्यतः आठ मुद्दे उपस्थित केले आहेत. संघाची अधिकृत नोंदणी कोणत्या कायद्यांतर्गत आहे, त्याला मिळणारा निधी कोणाकडून आणि कोणत्या स्रोतांतून येतो, त्याच्या मालमत्ता व खर्चाची माहिती सार्वजनिक का नाही, करसवलती किंवा करसंबंधी नियमांचे पालन कसे केले जाते, तसेच सार्वजनिक कार्यक्रम आणि पथसंचलनांसाठी आवश्यक परवानग्या कोणत्या कायदेशीर चौकटीत घेतल्या जातात, असे प्रश्न त्यांनी विचारले आहेत. याशिवाय, मोहन भागवत यांना दिल्या जाणाऱ्या उच्चस्तरीय सुरक्षा व्यवस्थेचा खर्च सार्वजनिक निधीतून होत असल्यास त्याबाबतही स्पष्टीकरण मागण्यात आले आहे.

लोकशाही व्यवस्थेचे एक मूलभूत तत्त्व म्हणजे उत्तरदायित्व. निवडून आलेली सरकारे, सार्वजनिक संस्था, स्वयंसेवी संघटना, कंपन्या आणि ट्रस्ट यांना विविध कायदेशीर नियमांचे पालन करावे लागते. त्यांच्या आर्थिक व्यवहारांची नोंद, लेखापरीक्षण आणि काही प्रकरणांत सार्वजनिक माहिती देण्याची जबाबदारी असते. त्यामुळे संघासारख्या मोठ्या आणि प्रभावशाली संस्थेबाबतही अशाच प्रकारच्या अपेक्षा व्यक्त होणे हे लोकशाही प्रक्रियेचा भाग मानले जाऊ शकते.

दुसरीकडे, संघाच्या समर्थकांचे मत वेगळे आहे. त्यांच्या मते आरएसएस ही पारंपरिक अर्थाने नोंदणीकृत संस्था नसून स्वयंसेवकांवर आधारित सामाजिक-सांस्कृतिक चळवळ आहे. संघाचे कार्य अनेक दशकांपासून खुलेपणाने सुरू असून त्याच्या शाखा, कार्यक्रम आणि उपक्रम सर्वांसमोर असतात. त्यामुळे त्याला लक्ष्य करून विचारले जाणारे प्रश्न राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप संघाकडून केला जात आहे. मोहन भागवत यांनीही या वादाकडे राजकीय दृष्टिकोनातून पाहण्याची भूमिका व्यक्त केल्याचे वृत्त आहे.

या संपूर्ण प्रकरणात महत्त्वाची बाब म्हणजे भावना किंवा राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा तथ्यांवर आधारित चर्चा होणे आवश्यक आहे. कोणतीही संस्था कायद्याच्या चौकटीत कार्य करत असेल तर तिने पारदर्शकतेबाबत योग्य माहिती देण्यास हरकत नसावी. त्याच वेळी, कोणत्याही संस्थेवर बेकायदेशीरतेचे आरोप करण्यासाठी ठोस पुरावे आणि कायदेशीर आधार आवश्यक असतो. केवळ प्रश्न उपस्थित केल्याने दोष सिद्ध होत नाहीत, तसेच प्रश्न विचारणे हेही लोकशाहीतील वैध अधिकार आहे.

भारतीय लोकशाहीची ताकद विविध विचारप्रवाहांच्या सहअस्तित्वात आहे. मतभेद असले तरी संवाद आणि उत्तरदायित्व या दोन मूल्यांवर लोकशाही उभी असते. संघासारख्या प्रभावशाली संस्थांबाबत पारदर्शकतेची अपेक्षा व्यक्त करणे चुकीचे नाही; त्याचप्रमाणे अशा अपेक्षांची पूर्तता करताना संस्थेच्या स्वायत्ततेचा आणि कायदेशीर अधिकारांचाही आदर राखला गेला पाहिजे.

या वादातून एक व्यापक प्रश्न पुढे येतोसार्वजनिक जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या सर्व संस्थांसाठी समान पारदर्शकतेचे निकष असावेत का? जर उत्तर होय असेल, तर त्या निकषांची अंमलबजावणी सर्वांवर समानपणे झाली पाहिजे. निवडक संस्थांवरच प्रश्न उपस्थित करून लोकशाहीची उद्दिष्टे साध्य होत नाहीत. समान कायदा, समान उत्तरदायित्व आणि समान पारदर्शकता हीच लोकशाहीची खरी कसोटी आहे.

आरएसएस आणि प्रियांक खरगे यांच्यातील हा वाद अखेरीस राजकीय मर्यादेपलीकडे जाऊन संस्थात्मक उत्तरदायित्व, नागरिकांचा माहितीचा अधिकार आणि लोकशाहीतील पारदर्शकतेच्या मूल्यांवर अधिक व्यापक चर्चा घडवून आणू शकतो. ही चर्चा तथ्याधारित, संयमी आणि संविधानिक चौकटीत होणे हेच देशाच्या लोकशाही आरोग्यासाठी हितावह ठरेल.

# चोरटी वाळू वाहतूक करणारा हायवा पकडला

## वाळू माफिया बाळू खेडकर विरुद्ध गुन्हा

बीड । प्रतिनिधी

**गेवराई तालुक्यात आणि चकलांबा परिसरातील वाळू माफिया बाळू उर्फ रत्नेश्वर शहादेव खेडकर याच्या विरुद्ध चकलांबा पोलिसांनी अवैधरित्या चोरटी वाळू वाहतूक करतांना पकडल्याने गौण खनिज उत्खनन आणि भारतीय दंड संहिता कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आहे. गेल्या अनेक दिवसापासून चोरटी वाळू वाहतूक करून उखळ पांढरे करणाऱ्या या वाळू माफिया विरुद्ध कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आलेली होती.**

गेवराई तालुक्यात आणि चकलांबा परिसरात गेल्या अनेक वर्षापासून पोलिसांच्या छुप्या पाठिंब्यामुळे बाळू खेडकर हा वाळू विक्रीचा गोरख धंदा करीत आहे. यापूर्वी चकलांबा येथे कार्यरत असलेल्या आणि बदलून गेलेल्या पोलिस अधिकाऱ्याच्या भागीदारीत त्याचा वाळूच्या वाहतुकीसाठी हायवा खुलेआम चालत होता. मात्र चकलांबा येथे नव्याने रुजू झालेल्या सहाय्यक निरीक्षक सचिन इंगळे यांनी त्याच्या सहकारी सहकारी सहकारी पोलिसांसह बाळू खेडकर याचा चोरटी वाहतूक करणारा हायवा पकडल्याने पोलिसांनी चांगली कारवाई केल्याची चर्चा होत आहे. या प्रकरणी चकलांबा पोलिस



ठाण्यात चकलांबा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १९०/ २०२६ व १९१/ २०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आता ट्रॅक्टरद्वारे वाळू वाहतूक केली जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे. दरम्यान या प्रकरणातील आरोपी फरार असल्याचे सांगण्यात आले. सदर कारवाई वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन इंगळे आणि त्यांच्या सहकारी पोलिसांनी केली.

# कत्तलीसाठी डांबून ठेवलेली ७ गोवंशीय जनावरे मुक्त, एकावर गुन्हा दाखल!

बीड । प्रतिनिधी

**पेठ बीड पोलिसांनी एका धडक कारवाईत कत्तलीच्या उद्देशाने निर्दयतेने डांबून ठेवलेल्या ७ गोवंशीय जनावरांची सुटका केली आहे. याप्रकरणी एका आरोपीविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायदा आणि महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई मंगळवारी (दि. १६ जून) दुपारी बारा वाजेच्या सुमारास करण्यात आली.**

१६ जून रोजी दुपारी १२:०० वाजेच्या सुमारास पेठ बीड पोलीस ठाण्याच्या मार्शल यांना 'डायल ११२' या आपत्कालीन क्रमांकावर एक महत्त्वाची माहिती मिळाली. कुरेशी फंक्शन हॉलच्या समोरील एका पत्र्याच्या शेडमध्ये चारा-पाण्याची कोणतीही सोय न करता,



कत्तल करण्याच्या उद्देशाने गोवंश जातीची जनावरे डांबून ठेवण्यात आल्याचे या माहितीवरून समोर आले. मार्शल यांनी ही माहिती तातडीने पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे यांना दिली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षकांनी मार्शल यांना घटनास्थळी जाऊन खात्री करण्याचे आदेश दिले. माहितीची खात्री पटताच पोलीस निरीक्षक निलेश केळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक साईनाथ बारगळ हे पोलीस कर्मचाऱ्यांच्या ताफ्यासह तातडीने घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी शेडवर छापा टाकून अत्यंत वाईट परिस्थितीत डांबून ठेवलेल्या ८६,००० रुपये किमतीच्या ७ गोवंशीय जनावरांची सुटका केली. याप्रकरणी पोलीस अंमलदार दिनकर मुंढे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी मुज्जु इक्बाल कुरेशी याच्याविरुद्ध पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १९३/२०२६ नुसार प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम १९६० चे कलम ३, ११ आणि महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५, ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक फौजदार खेत्रे करत आहेत. ही यशस्वी कारवाई बीडचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, प्रभारी पोलीस अधीक्षक चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकटराम (भा.पो.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नित्यानंद उबाळे, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ बारगळ, सहाय्यक फौजदार खेत्रे, पोलीस हवालदार विलास ठोंबरे, पोलीस हवालदार चांदणे, पोलीस अंमलदार दिनकर मुंढे आणि गणेश सानप यांच्या पथकाने केली आहे.

# धारूरमधील खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला रांजणीतून अटक

गेवराई । प्रतिनिधी

**धारूर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील मुख्य आणि फरार आरोपीला गेवराई पोलिसांनी मौजे रांजणी शिवारात मध्यरात्रीच्या सुमारास सापळा रचून अत्यंत शिताफीने ताब्यात घेतले. विश्वास उर्फ पोपट दादाराव डोंगरे (वय ४४, रा. बार्शी नाका, बीड) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.**

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, धारूर पोलीस ठाण्यात आरोपी विश्वास डोंगरे याच्याविरुद्ध भा.न्या. संहिता-२०२३ च्या कलम १०३(१), ३५१(२), ३५१(३), ३ (५) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा घडल्यापासून तो पोलिसांना चकवा देऊन फरार झाला होता. दरम्यान, हा आरोपी गेवराई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रांजणी येथे लपून बसल्याची गुप्त माहिती गेवराईचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना मिळाली. त्यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना याची कल्पना देऊन पोलिसांचे एक विशेष पथक रांजणीकडे रवाना केले.पोलीस पथकाने रांजणी येथे पोहोचून रात्री ११:३० वाजण्याच्या सुमारास आरोपीच्या संभाव्य ठाण्यावर सापळा लावला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी विश्वास याने अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्याचा जोरदार प्रयत्न केला. मात्र, सतर्क पोलीस कर्मचाऱ्यांनी त्याचा थरारक पाठलाग करून त्याला जागीच पकडले. आरोपीला गेवराई पोलीस ठाण्यात आणून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर पुढील कारवाईसाठी धारूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही धडक कारवाई प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सुरेश पारधी, नितीन शिंदे, लक्ष्मण जायभाय, जितेंद्र ओव्हाळ, गोरक्ष डोके, महादेव कदम, संदीप कांबळे आणि राजेंद्र चोरमले यांनी केली.

# गेवराईतील तय्यब नगर येथे एसटी बसला अधिकृत थांबा द्यावा

## मा.नगरसेवक सय्यद एजाज अहमद यांची एसटी आगार व्यवस्थापकांकडे मागणी

गेवराई । प्रतिनिधी

**गेवराई शहरातील तय्यब नगर व परिसरातील विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदारांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी भारत गैस, विद्युत महावितरण (एमएसईबी) कार्यालयासमोर एसटी बसचा अधिकृत थांबा मंजूर करण्यात यावा, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज अहमद यांनी गेवराई एस टी आगार व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.**

तय्यब नगर परिसराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून



येथून दररोज जिल्हा परिषद उर्दू शाळेचे विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी व नोकरदार तसेच वयवृद्ध महिला पुरुष मोठ्या संख्येने शहरात व इतर ठिकाणी प्रवास करतात सकाळी व सायंकाळी शाळा-महाविद्यालयांच्या वेळेत प्रवाशांची मोठी गर्दी असते. मात्र, या परिसरात एसटी बसचा अधिकृत थांबा नसल्यामुळे परिसरातील नागरिकांना व विद्यार्थ्यांना बस पकडण्यासाठी लांब अंतर पायी जावे लागते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून, महिला,पुरुष व ज्येष्ठ नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.त्यामुळे तय्यब नगर गेवराई येथे एसटी बसचा अधिकृत थांबा मंजूर झाल्यास प्रवाशांची मोठी सोय होईल, त्यांचा वेळ वाचेल तसेच प्रवाशांची संख्या वाढल्याने राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नातही वाढ होईल. निवेदनाद्वारे तय्यब नगर येथे सर्व नियमित एसटी बसांना अधिकृत थांबा मंजूर करावा,शाळा व महाविद्यालयांच्या सकाळी आणि सायंकाळीच्या वेळेत बसेस नियमित थांबवण्यात यावे,या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन तय्यब नगर येथे तात्काळ एसटी बसचा अधिकृत थांबा मंजूर करावा, अशी मागणी माजी नगरसेवक सय्यद एजाज अहमद यांनी केली आहे. यावेळी शेख निसार, सय्यद बादशाह, लाला तांबोली, सय्यद रौफ, शेख बाबू व त्यापरिसरातील नागरिकांनी केली आहे.

## पान १ वरून...

### साखर उद्योगाच्या मागण्यांवर केंद्रात

त्याचबरोबर साखर उत्पादनाचा खर्चही वाढून प्रतिकिलो सुमारे ४२ रुपयांपर्यंत पोहोचला आहे. उत्पादन खर्च आणि विक्री किंमत यामधील वाढती तफावत लक्षात घेता अनेक साखर कारखाने आर्थिक संकटात सापडले आहेत. या आर्थिक तणावामुळे देशभरातील साखर कारखान्यांकडे शेतकऱ्यांच्या उसाची सुमारे ८ हजार कोटी रुपयांहून अधिक थकबाकी निर्माण झाली आहे. त्यामुळे साखरेची किमान विक्री किंमत ३१ रुपयांवरून ४३ रुपये प्रतिकिलो करण्यात यावी, अशी उद्योगाची प्रमुख मागणी आहे. यामुळे ग्राहकांवर फारसा अतिरिक्त आर्थिक भार पडणार नसून सरकारच्या जीएसटी उत्पन्नातही वाढ होईल, असा दावा महासंघाने केला आहे. साखर उद्योगाने इथेनॉलच्या खरेदी दरात वाढ करण्याची मागणीही केंद्र सरकारकडे केली आहे. उद्योगाच्या मते, उसाच्या एफआरपीमध्ये १९.६७ टक्क्यांनी वाढ झालेली असताना इथेनॉलच्या खरेदी दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्यामुळे बी-हेवी मळीपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा खरेदी दर प्रतिलिटर ६७ रुपये आणि उसाचा रस अथवा सिरपपासून तयार होणाऱ्या इथेनॉलचा खरेदी दर प्रतिलिटर ७२ रुपये करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. देशात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण कार्यक्रम यशस्वीपणे राबविला जात असला तरी सुरुवातीला अतिरिक्त साखरेचा वापर करून साखर उद्योगाला आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या या योजनेत आता ऊस आधारित इथेनॉलचा वाटा ३० टक्क्यांपेक्षा कमी झाला असल्याचे महासंघाचे म्हणणे आहे. त्यामुळे साखर उद्योगाला चालना देण्यासाठी ऊस आधारित इथेनॉलसाठी स्वतंत्र आणि वाढीव कोटा मंजूर करावा, अशी मागणी उद्योगाकडून करण्यात आली आहे. साखर उद्योगाशी संबंधित धोरणात्मक निर्णयांमध्ये सुसंगतता आणि पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र सरकारने सर्व संबंधित मंत्रालये आणि उद्योग संघटनांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेला आंतर-मंत्रालयीन गट स्थापन करावा, अशी सूचनाही महासंघाने केली आहे. या गटामार्फत दर ३० दिवसांनी ऊस, साखर आणि इथेनॉल उत्पादनासंदर्भातील अधिकृत व अद्ययावत सरकारी अंदाज प्रसिद्ध करण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे उद्योगातील माहितीतील विसंगती दूर होऊन वेळेवर आणि अचूक धोरणात्मक निर्णय घेणे शक्य होईल, असा विश्वास महासंघाने व्यक्त केला आहे. साखर उद्योग देशातील लाखो ऊस उत्पादक शेतकरी, सहकारी साखर कारखाने आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी थेट जोडलेला असल्याने केंद्र सरकारच्या आगामी निर्णयांकडे संपूर्ण उद्योग क्षेत्राचे लक्ष लागले आहे. उद्योगाच्या या प्रमुख मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाल्यास शेतकरी, कारखाने आणि इथेनॉल क्षेत्राला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

---------------

### तारीख पे तारीखचा

बैठकीला गैरहजर राहिले, तर त्याला कायद्याच्या भाषेत 'डिसक्कालिफिकेशन बाय कंडक्ट' म्हटले जाते. म्हणजेच, त्यांच्या या वागणुकीवरूनच ते पक्षविरोधी कारवाया करत असल्याचे सिद्ध होते आणि ते थेट अपात्र ठरू शकतात.राजकीय वर्तुळात दोन तृतियांश (२/३) बहुमत सोबत असल्यामुळे बंडखोरांना संरक्षण मिळेल, असा जो दावा केला जात आहे, तो असीम सरोदे यांनी पूर्णपणे खोडून काढला. २०२२ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या एका महत्त्वपूर्ण निकालाचा हवाला त्यांनी यावेळी दिला. ते म्हणाले, ''२०२२ मध्ये सुभाष देसाई विरुद्ध इतर या खटल्यात तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी स्पष्ट निकाल दिला आहे. या निकालामुळे 'स्प्लिट' (पक्षातील उभी फूट) ही संकल्पनाच आता कायद्यातून हद्दपार झाली आहे. त्यामुळे केवळ २/३ खासदार फोडले म्हणून कोणालाही थेट संरक्षण मिळत नाही. २/३ बहुमताचा नियम केवळ तेव्हाच लागू होतो, जेव्हा एखादा मूळ राजकीय पक्ष दुसऱ्या पक्षात 'विलीन' () करण्याचा निर्णय पक्षप्रमुख घेतात. आत्ताच्या प्रकरणात मूळ पक्षाची विलीनीकरणाची कोणतीही इच्छा नाही, तर ही केवळ काही खासदारांची वैयक्तिक इच्छा आहे. त्यामुळे बंडखोर खासदारांचा वेगळा गट स्थापन करणेही चुकीचे ठरेल.राज्यसभेत भाजपला अनेक महत्त्वाची विधेयके मंजूर करण्यासाठी बहुमताची गरज आहे, आणि ही गरज पूर्ण करण्यासाठीच एकनाथ शिंदेंना बढावा दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

----------

### ठाकरे नंतर पवारांच्या राष्ट्रवादीची

फुटणार का, याविषयी तर्कवितर्क लढवले जाऊ लागले आहेत.ठाकरे गटाचे २० आमदारआहेत त्यात १ मेहकर- सिद्धार्थ खरात ,२ दर्यापूर गजानन लवाटे, ३ बाळापूर नितीन देशमुख, ४ वणी संजय देरकर,५ परभणी राहुल पाटील,६ विक्रोळी सुनील राऊत,७ जोगेश्वरी पूर्व- अनंत (बाळा) नर,८ दिंडोशी सुनील प्रभू,९ वर्सोवा हरुन खान,१० कलिना संजय पोतनीस,११ वांद्रे पूर्व वरुण सरदेसाई,१२ माहीम महेश सावंत,१३ वरळी आदित्य ठाकरे,१४ शिवडी अजय चौधरी,१५ भायखळा मनोज जामसूतकर,१६ खेड आळंदी बाबाजी काळे,१७ उमरगा प्रवीण स्वामी,१८ उस्मानाबाद कैलास पाटील,१९ बार्शी दिलीप सोपल,२० गुहागर भास्कर जाधव अशी संख्या आहे मात्र या दुसऱ्यानंदा फुटलेल्या पक्षाची स्थिती पाहून शरद पवार यांनी दक्षता घेतली असून त्यांनी आपल्या सर्व आमदार खासदाराची बैठक बोलावली असल्याचे समजते खरे पहिले तर भाजपच्या आशीर्वादानेच शिंदे यांनी ऑपरेशन२ टायगर यशस्वीकेले आहे .

--------------

### शंभर कोटीचा वाळू घोटाळा

देण्याचा प्रकार जिल्हाधिकारी यांनी केला असल्याचे बोलले जात आहे आज विजयसिंह पंडित यांनी पत्रकार परिषद घेत कारवाई न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त केली यासोबतच त्यांनी आपण आगामी अधिवेशनामध्ये हा मुद्दा लावून धरणार असल्याचेही सांगितले यासोबतच आपण न्यायालयात देखील जाणार असल्याचे सांगितले यातील महत्त्वाची बाब मध्ये लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीनंतरही कारवाई होत नसेल तर मोठे दुर्दैव म्हणावे लागेल प्रामुख्याने अधिकाऱ्यांच्या लाभिनेस वाळू महाग घोटाळ्यातील प्रमुख यांना वगळले असावे त्यामुळे आता तक्रारीमध्ये थेट जिल्हाधिकाऱ्यांनाही घेतले जावे कारण जिल्ह्याचे प्रमुख ते आहेत त्यांच्या आशीर्वादाशिवाय हा सर्व प्रकार घडलाच नसावा जर जिल्हाधिकाऱ्यांचे नाव तक्रारीमध्ये आले तर खोमणे यांच्यावर नक्कीच कारवाई होईल अशी आशा जनतेमधून व्यक्त केली जात आहे.

--------------

### स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी

त्यात यावर्षी आणखी १७ मतदारांची घट होवून ती ९८८ झाली आहे. या मतदार संघासाठी सर्वाधिक लातूर जिल्ह्यातील दहा तालुक्यात ३६७ मतदार आहेत. बीड जिल्ह्यात जिल्हा परिषद निवडणूक प्रक्रीया रखडली आहे. त्यामुळे याठिकाणी सदस्य अस्तित्वात नसल्यामुळे याठिकाणीच मतदारांची आकडेवारी कमी झाली आहे. तरीही या जिल्ह्यात ११ तालुक्यात ३०४ मतदार आहेत. त्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील ८ तालुक्यात ३१७ मतदार आहेत. हा मतदार कोणाला कौल देणार हे आजच्या होणा-या मतदार प्रक्रियेतून स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या निवडणूकीकडे तीनही जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

----------

### उद्घाटनापुर्वीच कोट्यावधीच्या

(लीकेज) छताचे पीओपी अनेक ठिकाणी कोसळू लागल्याने शासकीय कामाच्या दर्जावर आता मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या भव्य इमारतीचे उद्घाटन सुरुवातीला राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या हस्ते होणार होते. मात्र, इमारतीचे काही काम अपूर्ण राहिल्यामुळे हा सोहळा पुढे ढकलण्यात आला होता. त्यानंतर, अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनामुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली. आता या नवीन इमारतीचे उद्घाटन राज्याच्या नवनियुक्त उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते करण्याचे नियोजित आहे. केवळ छताचे पीओपीच नव्हे, तर यापूर्वी याच इमारतीच्या पायऱ्याही अचानक तुटून पडल्याची घटना घडली होती. रुग्णालय सुरू होण्यापूर्वीच एकापाठोपाठ एक अशा निकृष्ट कामाच्या बाबी समोर येत असल्याने बीडच्या नागरिकांमधून आणि रुग्णांच्या नातेवाईकांमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही जर इमारतीची ही अवस्था असेल, तर भविष्यात येथे उपचारासाठी येणाऱ्या माता आणि बालकांच्या सुरक्षेचे काय, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.कोट्यवधींचा निधी मंजूर होऊनही जिल्ह्यातील शासकीय कामांचा दर्जा खालावलेलाच दिसत आहे. रुग्णालय इमारतीच्या या दुरावस्थेनंतर ''बीड जिल्ह्यातील अशा शासकीय कामांवर तुम्ही खरोखर समाधानी आहात का?'' असा संतप्त सवाल आता सर्वसामान्य बीडकर एकमेकांना विचारत आहेत

**सुनेत्राताई पवार 'दादां'सारखा कडक निर्णय घेणार का?**

दिवंगत नेते अजितदादा पवार हे त्यांच्या तडफदार कार्यशैलीसाठी आणि प्रशासनावरील कडक पकडीसाठी ओळखले जात. शासकीय कामांमधील त्रुटींवर ते जागेवरच रोखठोक निर्णय घेत असत. आता बीड दौऱ्यावर येत असलेल्या उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री सुनेत्राताई पवार या देखील या संपूर्ण प्रकरणाची गांभीर्याने दखल घेणार का, निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांवर कडक कारवाई करणार का आणि 'दादां'सारखाच ऑन द स्पॉट निर्णय घेणार का, याकडे आता संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

-----------

### नागपूरच्या रस्त्यावर कॉक्रोच एल्गार!

सत्यपाल महाराज, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) नितेश कराळे, विविध विद्यार्थी संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि हजारो युवक-युवती सहभागी झाले होते. अभिजित दीपके म्हणाले, मी मुख्यमंत्र्यांच्या स्वगृही येऊन त्यांच्याविरोधात बोलत आहे. माझ्यावर कितीही केसेस टाकल्या, दबाव आणला, तरी मी मागे हटणार नाही. विद्यार्थ्यांच्या हक्कासाठी ही लढाई अखेरपर्यंत सुरू राहील.जयपूर येथे विद्यार्थ्यांचे प्रश्न, 'नीट' आणि सीबीएसई परीक्षांतील कथित गैरव्यवहाराचा मुद्दा उपस्थित केल्यामुळे आपल्यावर हल्ला झाल्याचा आरोप करत त्यांनी गेल्या १० ते १२ वर्षांपासून देशात हिंदू-मुस्लिमांच्या नावावर राजकारण सुरू असल्याची टीका केली. विद्यार्थ्यांनी धर्माच्या राजकारणात अडकण्याऐवजी शिक्षण आणि भविष्याच्या प्रश्नांसाठी एकत्र यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

-----------

### राज्यात पावसाची

मान्सूनने सुरुवातीला वेगाने प्रगती केल्यानंतर आता त्याचा वेग मंदावला आहे. ज्यामुळे त्याच्या पुढील वाटचालीस विलंब होत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, या मंदावलेल्या गतीचे मुख्य कारण म्हणजे अरबी समुद्राकडून येणा-या आर्द्रतायुक्त वा-यांचा अभाव, हे वारे मान्सूनला कोकण किनारपट्टीवरून उत्तरेकडे नेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात.

---------

महाराष्ट्र बंगाल नंतर यूपीत भाजपचे

पक्षाच्या खासदारांचा एक मोठा गट फुटेल, असा दावा उपमुख्यमंत्र्यांनी केला आहे.केशव प्रसाद मौर्य भाजप नेतृत्त्वाच्या जवळचे नेते मानले जातात. २०१७ मध्ये अमित शहा भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष असताना मौर्य यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपद देण्यात आलं होतं. बिगर यादव ओबीसी मतं एकगठ्ठा भाजपच्या बाजूनं वळवण्यासाठी मौर्य यांची निवड करण्यात आली. तर २०२२ मध्ये मौर्य यांना उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली. त्यावेळी विधानसभा निवडणुकीत मौर्य यांचा पराभव झाला होता. पण तरीही पंतप्रधान मोदी यांच्या सूचनेवरुन त्यांना उपमुख्यमंत्रिपद देण्यात आलं.महाराष्ट्रात भाजपने उद्धव ठाकरे यांची शिवसेना नंतर शरद पवार यांची राष्ट्रवादी आता पुन्हा दुसऱ्यांदा ठाकरेंची शिवसेना त्यानंतर दिल्लीत केजरीवाल यांचा आप पक्ष पुढे बंगाल मधील ममता यांची टीएमसी आणि आता यूपीतील सपा फोडण्याची रणनीती भाजपने सुरु केली आहे .

------------

थोडक्यात

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. १८ जून २०२६




## शिवनी येथील आदिवासी वस्तीमध्ये राबविले आयुष्यमान कार्ड वितरण शिबिर

बीड । प्रतिनिधी

राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान व पुकार संवेदना फेलो यांच्या संयुक्त विद्यमाने शिवनी ता.जी येथील आदिवासी भिल्ल वस्तीवर डॉ. सतीशकुमार सोळंके जिल्हा शल्यचिकित्सक जिल्हा शासकीय रुग्णालय बीड यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष्यमान कार्ड काढण्याचे शिबिर राबविण्यात आले

यावेळी गावचे सरपंच विजय सुपेकर, आरोग्य मित्र प्रवीण जोगदंड, वैभव भोले संवेदना फेलो तत्त्वशील कांबळे मिथुन जोगदंड, ज्योतीताई थोरात, साधनाताई वाघमारे आदी उपस्थित होते आदिवासी भिल्ल समाजातील शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे व विविध प्रमाणपत्र व कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागते प्रामुख्याने त्यांना उपजीविका भागवण्यासाठी ऊस तोडणीवर अवलंबून राहावे लागते येथील नागरिक ऊस तोडणी साठी इतर जिल्ह्यात अथवा इतर राज्यामध्ये स्थलांतरित व्हावे लागते ऊस तोडणी साठी तेथे गेल्यानंतर अपघात होतात विविध आजार बालके व महिला यांच्या विविध आरोग्य विषयी समस्या आल्यानंतर त्यांच्याकडे आर्थिक अडचण असते त्यामुळे त्यांना या आयुष्यमान कार्डाचा खूप मोठा उपयोग होणार आहे असे संवेदना फेलो तत्वशील कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले. यावेळी ४० ते ५० भिल्ल आदिवासी कुटुंबातील सर्व व्यक्तींचे आयुष्यमान कार्ड काढण्यात आले या योजनेमध्ये पाच लाखापर्यंतचे आरोग्य विमा कवच आहे तसेच जे नागरिक ७० वर्षाच्या पुढील आहेत त्यांचे वयोवंदना कार्ड काढण्यात आले ज्याच्यामध्ये दहा लाखापर्यंत चा आरोग्य विम्याचे कवच आहे. संस्थेच्या वतीने व पुकार संवेदना फेलो च्या वतीने आदिवासी सर्व नागरिकांचे विविध प्रमाणपत्र काढून देण्याचे मदत काम सुरु आहे.

## गोपाल पैंजणेची पक्षातून हकालपट्टी

माजलगाव । प्रतिनिधी

प्रहार संघटनेचे माजलगाव तालुकाध्यक्ष गोपाल पैंजणे यांच्याविरोधातील कथित व्हायरल ऑडिओ प्रकरण आणि त्यानंतर समोर आलेल्या विविध तक्रारींची दखल घेत अखेर संघटनेच्या वरिष्ठांनी मोठी कारवाई केली आहे. गोपाल पैंजणे यांना तालुकाध्यक्ष पदावरून हटविण्यात आले असून संघटनेच्या प्राथमिक सदस्यत्वातूनही निष्कासित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे प्रहार संघटनेत मोठी खळबळ उडाली आहे.

काही दिवसांपूर्वी बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटपासाठी निधी मागणी केल्याचा कथित ऑडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या प्रकरणाची वृत्तपत्रांनी दखल घेत वृत्त प्रसिद्ध केले होते. त्यानंतर संघटनेच्या वरिष्ठांकडे तक्रारींचा ओघ वाढला होता. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन वरिष्ठ पातळीवरून माहिती मागविण्यात आली होती. दरम्यान, प्रहार संघटनेचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष महेंद्र ऊर्फ बल्लू जवंजाळ यांनी जारी केलेल्या पक्षादेशानुसार गोपाल पैंजणे यांना माजलगाव तालुकाध्यक्ष पदावरून कमी करण्यात आले आहे. तसेच त्यांना संघटनेतून निष्कासित करण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पक्षादेशात संघटनेचे ध्येय, धोरण आणि उद्दिष्टांचे पालन करण्यात अपयश आल्याचा तसेच आर्थिक स्वरूपाच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. ही कारवाई प्रहार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बच्चूभाऊ कडू यांच्या आदेशानुसार करण्यात आल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. यापुढे गोपाल पैंजणे यांचा संघटनेशी कोणताही संबंध राहणार नसून त्यांनी संघटनेच्या नावाचा किंवा पदाचा वापर करू नये, अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

**पद आणि सदस्यत्व दोन्ही गेले**

प्रहार संघटनेने जारी केलेल्या आदेशानुसार गोपाल पैंजणे यांना केवळ तालुका प्रमुख पदावरून हटविण्यात आलेले नाही, तर संघटनेतूनही निष्कासित करण्यात आले आहे. त्यामुळे यापुढे त्यांचा संघटनेशी कोणताही संबंध राहणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# नियमभंग महागात ; नगरपालिका व वाहतूक पोलिसांचा अतिक्रमणावर दणका

बीड । प्रतिनिधी

नगरपालिका मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्या तसेच जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध भागांमध्ये नाल्यांवर व सार्वजनिक रस्त्यांच्या कडेला हातगाड्या लावून अतिक्रमण करणाऱ्यांवर नगरपालिका प्रशासन आणि जिल्हा वाहतूक पोलिसांनी संयुक्त कारवाई करत एकूण १० अतिक्रमणे काढली. यापूर्वी संबंधित हातगाडीधारकांना नाल्यांवर व वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या ठिकाणी व्यवसाय करू नये, अशा सूचना देवून पुष्पगुच्छ देवून आता तोंडी सांगतो यानंतर कारवाई करु असे समजविण्यात आले होते मात्र हातगाड्यावाल्यांकडून सूचना करूनही नियमांचे उल्लंघन सुरूच असल्याचे निदर्शनास आल्याने ही कारवाई करण्यात आली.






**सूचना दुर्लक्षित कराल तर कारवाई अटळ–वैभव पाटील**

व्यापारी बांधवांना या अगोदर फुल देवून समजावले होते की अतिक्रमण करुन नागरिकांना वेठीस धरु नका परंतू व्यापारी व हातगाडी चालक यांच्याकडून नियमांचे सतत उल्लंघन होत आहे यामुळे व्यापारी बांधवांनी नागरिकांना, पोलीस प्रशासन आणि नगरपालिका प्रशासनाला सहकार्य करावे अन्यथा कारवाई अटळ राहील असे जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी म्हटले आहे.

या कारवाईसाठी पोलीस हवालदार सखाराम घोलप, आदिनाथ मुंडे, काकडे, कुडके, महिला पोलीस अंमलदार उषा गाडे, पवार, तिडके, पोलिस अंमलदार मोरे, कानडे, दहातोंडे, घाडगे, जिल्हा वाहतुक शाखेचे चालक संतोष हारके व कदम यांनी सहभाग नोंदवून कर्तव्य बजावले. तसेच नगरपालिका कर्मचारी अतिक्रमण पथकप्रमुख मुन्ना गायकवाड, भागवत जाधव, शरद खुपसे, विकी दागड, लखन तुसांबड, अविनाश दुलगज, महेश खुपसे, किरण भिसे, राम रोकडे, पवन लाहोट आदींनी सहभाग नोंदविला .

या मोहिमेदरम्यान नाल्यांवर उभारण्यात आलेल्या हातगाड्या हटविण्यात आल्या तसेच संबंधितांना भविष्यात अशा प्रकारचे अतिक्रमण न करण्याचा इशाराही देण्यात आला. नाल्यांवरील अतिक्रमणामुळे पावसाळ्यात पाण्याचा निचरा बाधित होण्याची शक्यता असून वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असल्याचे नगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नगरपालिका प्रशासनाने व जिल्हा वाहतूक शाखेने शहरातील नागरिक आणि व्यावसायिकांना नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले असून सार्वजनिक जागांवरील अतिक्रमणाविरोधातील कारवाई यापुढेही सुरू राहणार असल्याचे सांगितले. या संयुक्त कारवाईमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यास आणि स्वच्छता व्यवस्थेला मदत होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली.

## पाच महिन्यांत मुख्याधिकाऱ्यांची बदली ; धारूर नगरपरिषदेचा कारभार पुन्हा प्रभारींच्या हाती ?

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अशितोष चिंचाळकर यांची अवघ्या पाच महिन्यांच्या कार्यकाळानंतर बदली झाल्याने नगरपरिषदेच्या प्रशासकीय कारभाराबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने १७ जून २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार यांची बदली वसमत नगरपरिषद, जिल्हा हिंगोली येथे मुख्याधिकारी म्हणून करण्यात आली असून त्यांच्या जागेवर अद्याप नियमित मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती झालेली नाही.

अशितोष चिचाळकर यांनी जानेवारी २०२६ मध्ये धारूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारीपदाचा पदभार स्वीकारला होता. मात्र कार्यकाळात ते आठवड्यातील केवळ काही दिवस आणि काही तासांसाठीच कार्यालयात उपस्थित राहत असल्याची चर्चा शहरात होत होती. त्यामुळे अनेक विकासकामे, प्रशासकीय निर्णय आणि नागरिकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीस विलंब होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, मुख्याधिकाऱ्यांच्या बदलीमुळे त्यांचे पद रिक्त झाले असून नगरपरिषदेचा कारभार पुन्हा प्रभारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून चालवावा लागणार असल्याची शक्यता आहे. यामुळे शहरातील विकासकामांच्या गतीवर परिणाम होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

धारूर नगरपरिषद सध्या सत्ताधारी आ प्रकाशदादा सोळंके यांच्या प्रभावक्षेत्रात असून, नगरपरिषदेला सक्षम व पूर्णवेळ मुख्याधिकारी मिळावा याकडे पुरेसे लक्ष देण्यात आले नसल्याची टीका काही नागरिकांकडून केली जात आहे. विशेषतः नव्याने निवडून आलेल्या नगराध्यक्षा व पदाधिकाऱ्यांसमोर शहराचा कारभार प्रभावीपणे हाताळण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

धारूर शहरात पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, नागरी सुविधा आणि विविध विकासकामे सुरू असताना नियमित व सक्षम मुख्याधिकाऱ्यांची नियुक्ती होणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. शासनाने तातडीने पूर्णवेळ मुख्याधिकारी नियुक्त करून नगरपरिषदेचा कारभार सुरळीत व प्रभावीपणे चालविण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे

पान ६ वरुन...

### फी थकली म्हणून विद्यार्थ्याचा

मिळण्याबाबत अर्ज केला असता, शाळा प्रशासनाने उर्वरित फी आणि दंडाची संपूर्ण रक्कम भरल्याशिवाय दाखला देण्यास स्पष्ट नकार दिला. शाळेच्या या भूमिकेमुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होण्याची टांगती तलवार निर्माण झाली आहे.

शिक्षणाधिकाऱ्यांकडे धाव आणि आंदोलनाचा इशारा

या गंभीर प्रकरणाची दखल घेत शिवसेना शहरप्रमुख गजानन कदम यांनी शिक्षणाधिकारी व गट शिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे. ''फी वसुलीसाठी कायदेशीर मार्ग उपलब्ध असताना, विद्यार्थ्याचा टीसी रोखून त्याचे शिक्षण अडवणे ही अत्यंत गंभीर बाब आहे,'' असे कदम यांनी म्हटले आहे. विद्यार्थ्याचा शिक्षणाचा मूलभूत हक्क अबाधित ठेवून त्याला त्वरित टीसी मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

### दुहेरी गुन्ह्यातील फरार

प्रक्रियेनंतर रीतसर अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अण्णासाहेब पवार करत आहेत.ही कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि. समाधान दौड, पोलीस कर्मचारी गोरक्ष डोके, ऋषी पोटे, रामराजे काकडे आणि संदीप कांबळे यांच्या पथकाने यशस्वी केली.

### बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी

असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. हा आदेश महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने शासनाचे अवर सचिव अ. का. लक्कस यांनी जारी केला आहे.

शहरात उलटसुलट चर्चा

बीड नगरपरिषदेत कार्यरत असताना श्री. फडसे यांनी आपल्या कामाचा चांगला ठसा उमटवला होता. त्यांच्या अचानक झालेल्या बदलीमुळे बीड शहरात आणि नगरपरिषद वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे. एका चांगल्या अधिकाऱ्याची बदली झाल्याने नागरिकांमधून हळहळ व्यक्त होत आहे. आता बीड नगरपरिषदेचा पदभार कोणाकडे सोपवला जातो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### बीड एलसीबीची कामगिरी

अभिलेखाची पडताळणी केली असता, त्या घरफोडीबाबत बीड शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १२६/२०२६ कलम ३३१ (३) बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा नोंद असल्याचे समोर आलेगुन्हा १: शिवाजीनगर पोलीस ठाणे (गु.र.नं. १५५/२०२६) घरफोडी

गुन्हा २: बीड शहर पोलीस ठाणे (गु.र.नं. १२६/२०२६) हिना नगर भागातील घरफोडी मुद्देमाल जप्त: आरोपी कलीम शेख याच्याकडून घरफोडीसाठी वापरलेली दुचाकी आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. पुढील तपासासाठी आरोपीला मुद्देमालासह शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, पोलीस या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

सदरील धडक कामगिरी बीड जिल्ह्याच्या प्रभारी पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, आणि स्थानिक गुन्हे शाखेचे श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार राहुल शिंदे, गोविंद राख, पोलीस अंमलदार आश्पाक सय्यद, मनोज परजणे आणि चालक नितीनजी वडमारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### नेकनुर प्रकरणात

आमदार महेश लांडगे यांच्या भाषणांबाबत १९ मे २०२६ रोजी लेखी तक्रार, निवेदन तसेच व्हिडिओ पुरावे सादर करण्यात आले होते. त्यानंतर पेन ड्राइव्हसह आवश्यक कागदपत्रेही पोलिसांना देण्यात आली. मात्र अद्याप गुन्हा दाखल झालेला नसल्याने आणि कार्यवाहीबाबत कोणतीही स्पष्ट माहिती न मिळाल्याने पोलिस प्रशासनाला चौथ्यांदा लेखी निवेदन देण्यात आले. या निवेदनात तक्रारीवर आजपर्यंत झालेली कार्यवाही, गुन्हा दाखल झाला आहे का, झाल्यास क्रमांक व लागू केलेली कलमे, तसेच पुढील तपासाची सद्यस्थिती याबाबत माहिती मागविण्यात आली आहे. सामाजिक सलोखा, कायदा व सुव्यवस्था आणि सार्वजनिक शांततेच्या दृष्टीने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी शिष्टमंडळाने केली. यावेळी पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी बीड जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्याशी चर्चा करून योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले. नव्या नेतृत्वाचा सत्कार, सर्वांसाठी सुरू असलेल्या मोफत पाणी सभी के लिये उपक्रमातील कार्यकर्त्यांचा गौरव आणि न्यायासाठी पोलिस प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा, या तिहेरी उद्देशाने झालेला चे जिल्हाध्यक्षाचा हा दौरा नेकनूरमध्ये चर्चेचा विषय ठरला.


## उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाकडून चार संशयित आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर

### बचाव पक्षाच्या युक्तिवादास यश

बीड । प्रतिनिधी

दि. १७ जून २०२६ : कोल्हापूर जिल्ह्यातील शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ५५९/२०२३ मधील चार संशयित आरोपींना मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ कोल्हापूर यांनी आज जामीन मंजूर केला.

सदर गुन्हा दि. १९ मे २०२३ रोजी शाहूपुरी पोलीस ठाण्यात चार आरोपींविरुद्ध दाखल करण्यात आला होता. त्यानंतर आरोपींच्या वतीने दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सत्र न्यायालयात जामीन अर्ज क्रमांक ११०२/२०२५ दाखल करण्यात



आला होता. मात्र, सत्र न्यायालयाने तो अर्ज फेटाळून लावला होता.

यानंतर आरोपींच्या वतीने मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ कोल्हापूर येथे जामीन अर्ज क्रमांक १५३/२०२६, १५४/२०२६, १५५/२०२६ व १५७/२०२६ दि. १८ मार्च २०२६ रोजी दाखल करण्यात आले. या अर्जांवर सुनावणी झाल्यानंतर मा. न्यायमूर्तींनी आज दि. १७ जून २०२६ रोजी चारही आरोपींना जामीन मंजूर केला. सदर प्रकरणात आरोपींच्या वतीने ॲड. किशोर खेडकर, ॲड. विकास खाडे आणि ॲड. वैभव हलाके यांनी प्रभावी युक्तिवाद केला. बचाव पक्षाने प्रकरणातील तथ्ये, उपलब्ध पुरावे तसेच कायदेशीर बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर न्यायालयाने आरोपींना जामीन मंजूर करण्याचा आदेश दिला. या आदेशामुळे चारही आरोपींना मोठा दिलासा मिळाला असून, न्यायालयाच्या निर्णयाचे कायदे क्षेत्रात स्वागत होत आहे.

## पत्रकार उत्तम हजारे यांचा २८ जून रोजी परळीत सन्मान

बीड । प्रतिनिधी

पत्रकारितेत विविध वृत्तपत्रांच्या माध्यमातून सामाजिक विषयावर आवाज उठवणारे बीड येथील ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांचा दि.२८ जून रोजी परळी येथे विशेष सन्मान करण्यात येणार आहे .



रविवार दि.२८ जून रोजी सकाळी ११ वाजता परळी वैद्यनाथ येथील लोकनेते गोपीनाथराव मुंडे सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे. दैनिक वृत्तरत्न सम्राटचे संपादक कुणाल कांबळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन होईल तर प्रा. प्रदीप रोडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. पत्रकार उत्तम हजारे यांनी पत्रकारितेच्या तीस–पस्तीस वर्षात विविध वृत्तपत्राच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नावर निर्भीड लिखाण केले. बहुजन, कष्टकरी, आदिवासी , महिला, कामगार, विद्यार्थी, दलित अत्याचार आदी प्रश्नावर सातत्याने आवाज उठवुन, आंबेडकरी व बहुजन– ओबीसी आणि धम्म चळवळ गतिमान करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे पत्रकारितेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ज्येष्ठ पत्रकार उत्तम हजारे यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास प्रसिद्ध साहित्यीक अजयकुमार गंडले, नगरसेवक अनंत इंगळे, संतोष रोडे, विचारवंत प्रा. डॉ. दयानंद झिंझुर्डे, विनोद कांबळे, मुप्टा प्राथमीकचे जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब आदोडे, विकास रोडे, दै.संघर्ष नेताचे संपादक मोहन व्हावळे, पत्रकार भारत साकसमुद्रे आदींची उपस्थिती राहणार आहे.

प्रा. प्रदीप रोडे यांचा गौरव

परळीचे भूमीपुत्र असलेले प्रा. प्रदीप रोडे यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. परळीतील नवनिर्वाचित नगरसेवक, डीजे मुक्त जयंती साजरी करणारे पदाधिकारी यांचाही यावेळी सत्कार करण्यात येणार आहे. परळी येथे होणाऱ्या या कार्यक्रमास समाजबांधवांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कार्यक्रमाचे मुख्य आयोजक पत्रकार रानबा गायकवाड, विलास ताटे, विकास वाघमारे, चंद्रमणी वाघमारे आदींनी केले आहे .

५१ हजाराची थैली देणार

दैनिक सम्राटचे संपादक कुणाल बबन कांबळे यांना परळीतील समाज बांधवाच्या वतीने ५१ हजार रुपयांची थैली या कार्यक्रमात अर्पण करण्यात येणार आहे.

## ज्येष्ठांच्या आयुष्याला आधाराचा हात : तहसीलमध्ये ज्येष्ठ नागरिक सुविधा केंद्राची सुरुवात

बीड । प्रतिनिधी

समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मान, सुरक्षितता आणि न्यायप्रवेशाला अधिक बळकटी देण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड आणि तहसील कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दि १६ मे रोजी तहसील कार्यालय परिसरात ज्येष्ठ नागरिक सुविधा केंद्राची स्थापना करण्यात आली . प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष दिनेश पी. सुराणा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ. वहाब ए. सय्यद यांच्या हस्ते या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, अण्णा वंजारे, विधीदूत अशोक तांगडे, तत्त्वशील कांबळे, महसूल सहाय्यक हेमलता परचाके, वैशाली बहिरवाळ, महेंद्र राऊत तसेच महसूल विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांच्या विविध अडचणी, हक्कांचे संरक्षण आणि शासकीय योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. वहाब ए. सय्यद यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदेशीर सेवा योजना–२०१६ अंतर्गत वृद्धांना मोफत कायदेशीर सल्ला, मार्गदर्शन आणि न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. अनेक ज्येष्ठ नागरिकांना मालमत्ता, वारसा, कौटुंबिक वाद, निवृत्तीवेतन, आर्थिक फसवणूक आणि विविध शासकीय योजनांबाबत अडचणी येतात. अशा वेळी हे सुविधा केंद्र त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणारे प्रभावी माध्यम ठरणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांनी ज्येष्ठ नागरिकांना ऑनलाईन




फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन करताना कोणालाही ओटीपी, बँक खात्याची माहिती किंवा बायोमेट्रिक माहिती देऊ नये, असे स्पष्टपणे सांगितले. डिजिटल युगात जागरूकता आणि सतर्कता हीच सर्वात मोठी सुरक्षा असल्याचे त्यांनी नमूद केले. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शासनाच्या विविध योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या केवळ कायदेशीर स्वरूपाच्या नसून त्या सामाजिक, आर्थिक आणि भावनिक स्वरूपाच्याही असतात. त्यामुळे जिल्हा प्रशासन आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या समन्वयातून सुरू झालेले हे केंद्र ज्येष्ठांसाठी विश्वासाचे व्यासपीठ ठरेल. कोणत्याही प्रकारची अडचण, अन्याय किंवा शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन हवे असल्यास ज्येष्ठ नागरिकांनी संकोच न बाळगता या केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रशासन त्यांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी संदेश दिला की, शासनाच्या सेवा नागरिकांच्या दारी पोहोचविणे हे प्रशासनाचे मूलभूत कर्तव्य आहे. यासाठी बीडचे जिल्हाधिकारी वेळोवेळी सुचना देत असतात . अनेक ज्येष्ठ नागरिकांना विविध कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागतात, त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम खर्च होतात. या सुविधा केंद्रामुळे त्यांना आवश्यक माहिती, अर्ज प्रक्रियेचे मार्गदर्शन, तक्रार निवारण, कायदेशीर सल्ला आणि शासकीय योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. तत्त्वशील कांबळे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या घरगुती वाद, मालमत्ता विषयक प्रश्न, देखभाल हक्क, निवास, आरोग्य आणि इतर कायदेशीर समस्यांबाबत विधीदूतांच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या सेवांची माहिती दिली. तसेच ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या अडचणी दडवून न ठेवता संबंधित यंत्रणांशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले.या उपक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ज्येष्ठ नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेले मोफत आरोग्य तपासणी शिबिर! डॉ. स्वप्ना घोळवे आणि डॉ. भिसे यांनी उपस्थित ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला. या सुविधा केंद्रामुळे कायदेशीर मदत, शासकीय योजनांचे मार्गदर्शन, आरोग्यविषयक सहाय्य, तक्रार निवारण आणि विविध शासकीय सेवांचा लाभ एकाच छताखाली उपलब्ध होणार असल्याने ज्येष्ठ नागरिकांची विविध कार्यालयांच्या फेऱ्यांपासून मोठी सुटका होणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी केले, तर आभार प्रदर्शन अण्णा वंजारे यांनी मानले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे विधीदूत, विधी महाविद्यालयाचे पीएलव्ही आणि मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. ज्येष्ठांच्या सन्मान, सुरक्षितता आणि न्यायप्रवेशासाठी उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल असून गरजू ज्येष्ठ नागरिकांनी या सुविधा केंद्राचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

जाहिर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ९७५/२०२६**
**लता पि.मारूती जगताप विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय पालसिंगन**

पहा

१.लता पि.मारुती जगताप रा.पालसिंगन ता. जि. बीड (ह.मु.धाराशीव)

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून लता मारोती जगताप यांचा दिनांक ०१/०६/१९६८ रोजी जन्म झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयास पालसिंगन ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे पालसिंगन ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १५/०६/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १५/०७/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

# रविकांत तुपकरांच्या अन्नत्याग आंदोलनाचा वणवा पेटला

## बुलढाण्यात जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच युवकाचा आत्मदहनाचा प्रयत्न

बुलढाणा : शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी कोणत्याही अटी शर्ती न लावता सरसकट शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आंदोलनाचा वणवा चांगलाच भडकला आहे. ठीक ठिकाणी शेतकरी रस्त्यावर उतरून फसव्या कर्जमाफीचा जीआर जाळत आहेत. आज बुलढाण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर भाजीपाला व दूध फेकून युवकाने आत्मदहनाचा प्रयत्न केला. तर जळगाव जामोद मध्ये कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयावर चढून घोषणाबाजी केली.

अनेक ठिकाणी रस्त्यावर टायर जाळून सरकारचा शेतकऱ्यांनी निषेध केला आहे. शेतकऱ्यांसाठी कर्जमुक्तीच्या मागणीसाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केल आहे. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून अनेक ठिकाणी शेतकरी रस्त्यावर उतरत आहेत. तर बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकऱ्यांनी दूध आणि भाजीपाला फेकून एका शेतकऱ्याने आत्महत्याग्रहणाचा प्रयत्न केला वेळीच पोलिसांनी हस्तक्षेप करत या शेतकऱ्याला ताब्यात घेतलं तर जळगाव जामोद येथे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयावर चढून सरकार विरोधी घोषणाबाजी केली अनेक भागात शेतकरी रस्त्यावर उतरत असून काही ठिकाणी रस्त्यावर टायर जाळून शेतकऱ्यांनी सरकारचा निषेध केला.



## सोयाबीनची काढणी, मळणी, साठवण योग्य पद्धतीने करा



सोयाबीन लागवड करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. याबरोबरच देशातील सोयाबीनचे उत्पादनही मागील काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे पाहायला मिळाले आहे. असे असले तरी प्रत्यक्षात मात्र सोयाबीनची उत्पादकता कमी झाल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे. म्हणजे पूर्वी एकरी जितका सोयाबीन निघायचा त्याप्रमाणात आता कमी निघत आहे.

सोयाबीनचे अयोग्य नियोजन अन काढणी, मळणी, साठवण तंत्र यातील चुका सोयाबीनची उत्पादकता कमी होण्यास कारणीभूत आहेत. अनेकदा सोयाबीन काढण्यास शेतकऱ्यांना उशीर होतो अन परिणामी त्याचा सोयाबीन उत्पदादानावर परिणाम होऊन उत्पादन घटते.

काढणी :सोयाबीन पीक पेरणीनंतर साधारणतः ९५ ते १०५ दिवसांत काढणीसाठी तयार होते. पीक परिपक्क झाल्यानंतर पिकाची काढणी लवकर करणे फार महत्त्वाचे आहे. योग्य वेळी काढणी न केल्यास शेंगा तडकून उत्पादनात १५ ते २० टक्के घट येते. पीक परिपक्क झाल्यानंतर ८५ ते ९० टक्के पाने देठासहित गळून पडतात. शेंगांचा रंग पिवळा ते काळसर होऊ लागतो. सोयाबीनचे उत्पादन आणि प्रत चांगली राखण्यासाठी पावसाचा अंदाज घेऊन पिकाची काढणी करावी. कारण, बियाणाला पक्कतेनंतर किंचित ओलावा लागला तरी बियाण्याची उगवणक्षमता कमी होते. बियाण्यातील ओलावा १४ ते १५ टक्के असताना कापणीला सुरवात करावी. वेळेवर कापणी केल्यास मळणीमध्ये बियांचे नुकसान होत नाही. पिकाची काढणी धारदार कोयत्याने जमिनीलगत कापून करावी. झाडे उपटून येणार नाहीत याची काळजी घ्यावी. काढणीनंतर सोयाबीनचे एकत्र ढीग किंवा गंजी करून ठेवू नये. यामुळे त्यास बुरशी लागून धान्याची प्रत खालावते. काढणी केलेले पीक उन्हामध्ये चांगले वाळवावे. मळणीसाठी उशीर होणार असेल तरच वाळलेल्या सोयाबीनची गंजी करून ठेवता येईल.

मळणी :मळणी यंत्राने मळणी करताना बियाण्यातील आर्द्रता १४ टक्के पेक्षा कमी नसावी. मळणी यंत्राच्या फेऱ्याची गती प्रति मिनीट ४०० ते ५०० फेरे इतकी ठेवावी. बियाण्यातील आर्द्रतेचे प्रमाण १३ टक्के पर्यंत असेल तर मळणी यंत्राच्या फेऱ्याची गती ३०० ते ४०० फेरे प्रति मिनीट ठेवावी. मळणीवेळी अधूनमधून बियाण्यावर लक्ष ठेवावे. जेणेकरून त्याची डाळ होणार नाही. डाळ होण्याचे प्रमाण जास्त असल्यास वेग कमी करावा.साठवण : मळणीनंतर बियाणांची योग्य ठिकाणी साठवण करणे गरजेचे आहे. योग्य रीतीने साठवण न केल्यास उगवणशक्तीवर विपरीत परिणाम होतो. साठवण करण्यापूर्वी बियाणे २ ते ३ दिवस उन्हामध्ये चांगले वाळवावे. साठवण करतेवेळी बियाण्यामध्ये ओलाव्याचे प्रमाण १० ते १२ टक्के पेक्षा जास्त असू नये. शक्यतो साठवणुकीसाठी पत्र्याच्या कणगीची वापर करावा. पोत्यामध्ये साठवण केल्यास, पोते जमिनीवर सरळ उभे न ठेवता फळीवर ठेवावे. प्रत्येक पोते ८० किलोपर्यंत भरलेले असावे. पोती एकावर एक रचताना ४ पेक्षा पोते एकावर एक ठेवू नयेत.

## तुळशीच्या शेतीतून तीन महिन्यातच मिळते जोरदार कमाई

‘तुळस’ ही अत्यंत पवित्र मानली जाते. भारतात तुळशीला धार्मिक महत्व तर आहेच पण तुळस सामान्यतः डोकेदुखीपासून कर्करोगापर्यंतच्या विविध आजारांवर उपचार करण्यासाठी वैद्यकीय औषधी वनस्पती म्हणून वापरले जाते. त्यामुळे तुळशीची शेती फायदेशीर ठरू शकते. बियाण्यांपासून किंवा पाण्यात रुजवून रोपाची लागवड करणे सोपे आहे आणि त्याला फारच कमी देखभाल आवश्यक आहे. तुम्ही तुळस घरामध्ये कुंडीत ठेवू शकता किंवा तुमच्या भाज्या किंवा शोभेच्या बागेत देखील आंतरपीक म्हणून तुलसी लागवड करू शकता.

तुळशीच लागवड पद्धत :उच्च-गुणवत्तेच्या मातीने फ्लॉवर प्लांटर अर्धवट भरा आणि त्यास पूर्णपणे पाणी द्या. सुमारे एक इंच (२.५४ सेमी) खोली सोडा. माती ओलसर करण्यासाठी पुरेसे पाणी घाला, परंतु जास्त नको. जरी तुमची तुळशी बाहेर बेड करून लावू इच्छित असाल तरीही ते रोपण करण्यापूर्वी ते घरामध्येच वाढवण्याचा सल्ला दिला जातो. जमिनीच्या पृष्ठभागाच्या खाली १४ इंच (०.६४ सेमी) बिया पेरा तुळशीच्या बिया खूप लहान असल्यामुळे त्या जमिनीच्या वर शिंपडा आणि हळूवारपणे बोटांनी दाबा. बियाणे अंकुर येईपर्यंत ओलसर वातावरण ठेवा सुमारे १-२ आठवड्यांत, बिया फुटतील.



बिया खूप संवेदनशील असल्यामुळे, स्प्रे बाटलीने मातीच्या पृष्ठभागावर हलके शिंपडा. बियाण्यांना त्रास होऊ नये म्हणून भांड्यात पाणी टाकणे हळूहळू आणि काळजीपूर्वक केले पाहिजे. फ्लॉवर कंटेनरचा वरचा भाग प्लास्टिकच्या आवरणाने झाकल्याने ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते, तरीही आपल्याला माती तपासावी लागेल आणि आवश्यक असल्यास अतिरिक्त पाणी द्यावे लागेल. तुमच्या वनस्पतीला दररोज ६-८ तास थेट सूर्यप्रकाश आणि किमान ७० अंश फॅरेनहाइट (२१ अंश सेल्सिअस) तापमान आवश्यक असते. भांडे अशा ठिकाणी ठेवा जिथे त्याला भरपूर अप्रत्यक्ष सूर्यप्रकाश मिळेल. रात्रभर तापमान कमी झाल्यास, झाडाला खिडक्या किंवा दारे उघड्या न ठेवण्याची काळजी घ्या.

फक्त १५,००० रुपये गुंतवा :या शेतीसाठी सर्वात चांगली गोष्ट अशी आहे की तुम्हाला सुरुवात करण्यासाठी खूप पैशांची गरज नाही आणि तुम्हाला ते करण्यासाठी खूप जमिनीची गरज नाही. तुम्ही हा व्यवसाय १५,००० रुपयांमध्ये सुरू करू शकता.

३ महिन्यात ३ लाख कमवा :बियाणे पेरल्यानंतर, तुम्हाला या व्यवसायात कापणीसाठी जास्त वेळ प्रतीक्षा करावी लागत नाही. हे रोप फक्त ३ महिन्यांत तयार होणार असून, तुळशीचे पीक सुमारे ३ लाखांना विकले जाणार आहे. अनेक आयुर्वेदिक उत्पादन उत्पादकांना तुळशीची रोपे लागतात, अशा प्रकारे ते कंत्राटी शेतीद्वारे त्यांची खरेदी करतात. डाबर, वैद्यनाथ आणि पतंजलीसह अनेक कंपन्या तुळशीच्या शेतीत गुंतलेली आहेत. याचा अर्थ तुम्ही फक्त ३ महिन्यांत ३ लाख कमवू शकता.

तुळशीच्या शेतीसाठी कर्ज आणि अनुदान :नॅशनल मेडिसिनल प्लांट बोर्ड, जे आयुष मंत्रालयाचा भाग आहे. शेतकऱ्यांना औषधी पीक लागवड आणि व्यवस्थापनासाठी अनुदान देते. अनुदान संस्थेच्या प्रजातींच्या व्याख्येवर आधारित आहे, याबाबतची माहिती एनएमपीबी वेबसाइटवर स्पष्टपणे नमूद केले आहे. केंद्रीय आयुष मंत्रालय एनएएम (राष्ट्रीय आयुष मिशन) योजनेतील औषधी वनस्पतींचा भाग लागू करत आहे, ज्यामध्ये निवडलेल्या जिल्ह्यांमधील विशिष्ट क्लस्टर्स/झोन्समध्ये प्राधान्य औषधी वनस्पतींची बाजार-चालित शेती समाविष्ट आहे. या कार्यक्रमांतर्गत १४० औषधी वनस्पतींच्या शेतीसाठी विशिष्ट वनस्पती प्रजातींच्या उत्पादन खर्चाच्या ३०%, ५०% आणि ७५% अनुदान दिले जाते.

## ‘जनावरांची वार अडकणे’; कारणे आणि उपाय!

पशुपालन व्यवसायामध्ये जनावरांना देखील विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात. यातील काही समस्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून तर काही प्रजननाच्या वेळी निर्माण होतात. प्रजननाच्या संबंधित समस्या जनावरांना उद्भवल्या तर त्याचा थेट परिणाम हा पशुपालनाच्या आर्थिक गणितावर होतो. जनावरांमध्ये व्यायल्यानंतर वार अडकणे ही एक सर्वसामान्यपणे आढळणारी समस्या आहे. यावेळी जनावरांची काळजी घेणे गरजेचे असते.

जनावर व्यायल्यानंतर वार हा सहा ते सात तासाच्या आत पडणे आवश्यक असते. बर्याचदा तसे न होता त्याला वेळ लागतो. याची बरेच कारणे आहेत. वार म्हणजे जार हा एक गर्भाशयात तयार होणारा तात्पुरता अवयव असून, वासराचा जन्म झाल्यानंतर शरीराकडून वासरास होणारा रक्तप्रवाह बंद झाल्यामुळे त्याच्या पेशी निर्जीव होतात व पाण्याचा अंश कमी झाल्याने वार आकुंचन पावते. यामुळे तिचा गर्भाशयाची संपर्क तुटतो व ती लांब होते. परंतु बऱ्याचदा ती अडकते.

वार अडकण्याची प्रमुख कारणे :जनावरांमध्ये असलेल्या अनुवंशिकतेमुळे वार पडू शकत नाही. प्रथमतः प्रसूत होणारी जनावरे व वय झालेली जनावरे. गाभण काळ पूर्ण होण्याआधीच प्रसूती झाल्यास वार अडकू शकते. नर वासरू असल्यास



वार अडकू शकते. व्यायला आलेली गाय किंवा म्हैस जास्त अंतर चालवत नेल्यास, योग्य प्रमाणात व्यायाम न दिल्यास वार अडकू शकते. जनावरांमध्ये असलेले संप्रेरकांचे कमी प्रमाण वार अडकणे मागे प्रमुख कारण आहे. कॅल्शियम, फास्फोरस, आयोडीन सारख्या खनिज द्रव्यांची कमतरता. जीवनसत्व अ किंवा कॅरोटीन व जीवनसत्व ब सारख्या जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे वार अडकू शकते. हे प्रमाण लठ्ठ गाईंमध्ये जास्त प्रमाणात दिसते. गर्भाशयाची आकुंचन व प्रसरण पावण्याची क्रिया कमी होणे. एखाद्या वेळेस विषबाधा, ॲलर्जी झाली तरी वार अडकू शकते जनावरांनी बुरशीजन्य खाद्य खाल्ले तरी त्याचा परिणाम वार अडकण्यामध्ये मध्ये होतो. शस्त्रक्रिया करून वासरू काढल्यास वार अडकून राहण्याची शक्यता वाढते. गर्भाशयात पीळ पडल्यामुळे वार अडकण्याची समस्या निर्माण होते.

वार अडकू नये म्हणून उपाय : जनावरांमध्ये वार अडकू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून व्यायला आलेल्या गाई, म्हशी दररोज तासभर मोकळे सोडाव्यात त्यांना कमीत कमी एक किलो मीटर चालवत न्यावेत. तसेच तज्ञ पशुवैद्यकांच्या सल्ल्याने व्यायला आलेल्या जनावरांची काळजी घ्यावी. जनावर विल्यानंतर दोन तासाच्या आत जनावरांना एक मुळा खाऊ घालावा. समजा जनावर व्यायलास आठ तास झाले तरी जार पडला नसेल तर दीड किलो भेंडीचे दोन भागात काप करावेत व गूळ व मिठासोबत जनावराला खाऊ घालावे. जनावर व्यायल्यानंतर बारा तास उलटून देखील वार पडला नसेल तर जार अर्थात वाराच्या मुळाशी गाठ बांधून गाठी पासून तीन इंच खालून वार कापावा. गाठ योनिमार्ग पर्यंत परत जाते. हाताने वार काढण्याचा प्रयत्न करू नये. जनावर व्यायल्यानंतर चार आठवडे होईपर्यंत एक मुळा प्रत्येक आठवड्याला खाऊ घालावा.




### महत्वाच्या घटना

१५७६ : मुघल शासक अकबर आणि महाराणा प्रताप यांच्यात हळदी घाटीच्या युद्धाला सुरुवात झाली.
१७७६ : महाराणा प्रताप व अकबर यांच्यात 'हळदी घाटा' ची सुप्रसिध्द घनघोर लढाई झाली.
१८१५ : वॉटर्लूच्या लढाईत नेपोलियनचा दारुण पराभव
१८३० : फ्रान्सने अल्जीरिया ताब्यात घेतले.
१९०८ : फिलीपाइन्स विश्वविद्यालाची स्थापना झाली.
१९३० : चीनचा सम्राट डोवागर लोंग्यू याने देशातील सर्व परदेशी व्यक्तींना ठार करण्याचा हुकूम दिला.
१९४६ : डॉ. राममनोहर लोहिया यांनी गोव्याच्या मडगाव शहरातून गोवा मुक्तीचे रणशिंग फुंकले. या घटनेच्या स्मरणार्थ पणजींतील एका रस्त्याला '१८ जून रस्ता' असे नाव देण्यात आले आहे.
१९५६ : रँग्लर र. पु. परांजपे पुणे विद्यापीठाचे दुसरे कुलगुरू झाले.
१९८१ : जनावरांमधे आढळणार्या लाळ्या-खुरकुत रोगावरील पहिली जनुकीय लस विकसित झाली.
१९८३ : अंतराळवीर सैली राइड या अंतराळात प्रवास करणाऱ्या पहिल्या अमेरिकन महिला आहेत.
१९८७ : एम. एस. स्वामिनाथन यांना प्रथम जागतिक अन्न पुरस्कार (वल्ड फूड) मिळाला.
२००६ : कॅझसॅट या कझाकस्तानच्या पहिल्या उपग्रहाचे प्रक्षेपण.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध घेण्यासाठी विशेष उपग्रह पाठविला.
२०१३ : भारताच्या उत्तराखंड राज्यात मुसळधार पाउस पडून मंदाकिनी व अलकनंदा नद्यांना महापूर. शेकडो मृत्युमुखी, हजारो बेघर.
२०१७ : किदम्बी श्रीकांतला इंडोनेशिया सुपर सीरिजचे जेतेपद भारतीय बॅडमिंटनपटू किदम्बी श्रीकांतने इंडोनेशिया सुपर सीरिज प्रिमिअरच्या पुरुष एकेरीत जेतेपद पटकावले. असे करणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे.
२०१७ : भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार सुनील छेत्रीने समकालीन खेळाडूंमध्ये सर्वाधिक गोल करणाऱ्यांच्या यादीत चौथ्या स्थानावर झेप घेतली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : राजपूत नेपाळ शासक तसचं, नेपाळचे पहिले पंतप्रधान व राणा राजवंशाचे संस्थापक जङ्गबहादुर राणा यांचा जन्मदिन.
१८८७ : थोर भारतीय स्वातंत्र्य सेनानी, राजकारणी, शिक्षक, राजनीतिज्ञ, तसचं, बिहार राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री डॉ.अनुग्रह नारायण सिन्हा यांचा जन्मदिन.
१८९९ : शंकर त्रिंबक तथा 'दादा' धर्माधिकारी स्वातंत्र्यसेनानी व समाजसुधारक (मृत्यू: १ डिसेंबर १९८५)
१९११ : कमला सोहोनी पहिल्या भारतीय महिला शास्त्रज्ञ (मृत्यू: ८ सप्टेंबर १९९७)
१९३१ : के. एस. सुदर्शन प्रखर राष्ट्रवादी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ५ वे सरसंघचालक (मृत्यू: १५ सप्टेंबर २०१२)
१९३१ : ब्राझील देशाचे समाजशास्त्रज्ञ, प्राध्यापक आणि राजकारणी तसचं, ब्राझील देशाचे माजी राष्ट्रपती फर्नांडो हेन्रिक कार्डोसो यांचा जन्मदिन.
१९३४ : भारतीय वंशीय संगणक वैज्ञानिक, बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थान, संगणक विज्ञान विभागाचे माजी प्राध्यापक ई.वी. कृष्णमूर्ती यांचा जन्मदिन.
१९४२ : पॉल मॅकार्टनी संगीतकार, संगीतसंयोजक, वादक, गीतलेखक, 'बीटल्स'चा सदस्य
१९४२ : थाबो म्बेकी दक्षिण अफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष
१९६५ : उदय हुसेन सद्दाम हुसेन यांचा मुलगा (मृत्यू: २२ जुलै २००३)
१९८६ : फ्रेंच व्यावसायिक टेनिसपटू रिचर्ड गॅब्रिएल सायर गैस्के यांचा जन्मदिन.
१९८७ : इंग्लंड देशाचे महान क्रिकेटपटू मोईन अली यांचा जन्मदिन.
१९९४ : युवा भारतीयह टेनिसपटू प्रार्थना गुलाबराव ठोंबरे यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८५८ : मणिकर्णिका तांबे ऊर्फ 'राणी लक्ष्मीबाई' झाशीची राणी इंग्रजांचा पाठलाग टाळण्याच्या प्रयत्नात झालेल्या चकमकीत मृत्यूमुखी पडल्या (जन्म: १९ नोव्हेंबर १८२८)
१९०१ : रामचंद्र भिकाजी गुंजीकर 'मोचनगड' या मराठीतील पहिल्या ऐतिहासिक कादंबरीचे लेखक आणि 'विविध ज्ञानविस्तार' मासिकाचे संपादक (जन्म: १० एप्रिल १८४३)
१९०२ : सॅम्युअल बटलर इंग्लिश लेखक (जन्म: ४ डिसेंबर १८३५)
१९३६ : मॅक्झिम गॉर्की रशियन लेखक (जन्म: २८ मार्च १८६८)
१९५८ : डग्लस जार्डिन इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: २३ आक्टोबर १९००)
१९६२ : जे. आर. तथा नानासाहेब घारपुरे पुण्याच्या विधी महाविद्यालयाचे संस्थापक आणि प्राचार्य, नामवंत विद्वान (जन्म:)
१९७४ : सेठ गोविंद दास स्वातंत्र्यसैनिक, लोकसभेचे हंगामी सभापती, साहित्यिक (जन्म: १६ आक्टोबर १८९६)
१९९९ : श्रीपाद रामकृष्ण काळे ५२ कादंबर्या आणि ११०० हुन अधिक कथा लिहिणारे साहित्यिक, कथा आणि कादंबरीकार (जन्म: )
२००३ : जानकीदास हिन्दी चित्रपटातील चरित्र अभिनेते (जन्म: १९१०)
२००५ : भारतीय क्रिकेटपटू मुश्ताक अली यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९१४)
२००९ : उस्ताद अली अकबर खाँ तथा खाँसाहेब मैहर घराण्याचे जागतिक कीर्तीचे सरोदवादक, पद्?मविभूषण (१९८९), मॅकआर्थर फेलोशिप, संगीत नाटक अकादमी फेलोशिप, नॅशनल हेरिटेज फेलोशिप (जन्म: १४ एप्रिल१९२२ शिबपूर, कोमिल्ला, बांगला देश)
२०२० : लच्छमानसिंग लेहल मेजर-जनरल वीर चक्र, परम विशिष्ठ सेवा (जन्म: ९ जुलै १९२३)
२०२१ : मिल्खा सिंग द फ्लाइंग शीख, धावपटू पद्मश्री (जन्म: ८ ऑक्टोबर १९३५)



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# शेतकऱ्यांचे गाडीबैल व मुलाबाळासह तहसीलच्या आवारात ठिय्या आंदोलन

## आठ दिवसात निर्णय देण्याचे तहसीलदाराचे आश्वासन

मंठा। प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील विडोळी ते देवठाणा (मंठा) येथील शिव पांदण रस्स्त्याच्या कामात सतत अडथळा निर्माण करुन शेतात जाणाऱ्या रस्त्याचे काम अडविणाऱ्या गैरअर्जदार शेतकऱ्यांविरुद्ध कारवाई करून रस्ता खुला करून द्यावा या मागणीसाठी विडोळी येथील शेतकऱ्यांचे मागील सोळा दिवसांपासून तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू असून मंगळवार ता. १६ रोजी आपल्या न्याय मागणीसाठी हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी बैलगाडी व मुलाबाळांसह तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. या आंदोलनामुळे शेतकऱ्यांचे घरदार आणि शेतीकडे पूर्णतः दुर्लक्ष झाल्यामुळे शेतकरी संतप्त झाले. अखेर नायब तहसीलदार श्री काळदाते यांनी हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे आठ दिवसाची स्थगिती असल्याचे सांगून अर्जदार व गैरअर्जदार यांची सुनावणी तसेच पंचनामे, कागदपत्रे पाहून



आठ दिवसात निर्णय देण्याचे आश्वासन दिल्याने शेतकऱ्यांनी आपले आंदोलन तात्पुरते मागे घेतले. मात्र, आठ दिवसात न्याय न मिळाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला.

विडोळी खुर्द येथील शेतकऱ्यांच्या पुर्वीपासून वडिलोपार्जीत शेतजमीनी असून शिवारामध्ये जवळपास १०० ते १५० शेतकरी आहेत. त्यांना शेतात जाण्याकरिता विडोळी ते देवठाणा (मंठा) येथील शिवपांदण रस्त्याचे काम जवळपास दोन कि.मी. पूर्ण झालेले आहे. त्यानंतर शेतापर्यंत जाण्यकरिता केवळ २०० ते ३०० मीटर रस्त्याचे काम अपूर्ण राहिले आहे आणि ते अपूर्ण रहिलेले काम काही शेतकऱ्यांनी अडविले आहे. अपूर्ण राहिलेल्या या कामासाठी अनेक वेळा पाठपुरावा करूनही प्रशासनाने अद्याप पर्यंत रस्ता खुला करून दिला नाही. त्यामुळे न्याय कोणाकडे मागावा असा सवाल आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी उपस्थित केला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असून या दोनशे ते तीनशे मीटर रस्त्यावर गुडघाभर पाणी साचून त्यामध्ये साप, विंचू शेतकऱ्यांना इजा करण्याची शक्यता आहे.शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ते खुले करून द्यावेत याबाबत शासन निर्णय असताना सुद्धा शासनाच्या आदेशाला गैर अर्जदार शेतकरी हे केराची टोपली दाखवीत आहेत. मोजणी व पंचनामे झालेले असताना सुद्धा रस्ता आडविणाऱ्या शेतकऱ्यांना ते मान्य नाही. त्यामुळे हतबल झालेल्या शेतकऱ्यांनी आंदोलन आणखी तीव्र केले असून आज बैलगाडीसह गुरढोरं, महिला, लहान मुले सर्वच या मोर्चात सहभागी झाले होते. अखेर तहसीलदारांच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलनकर्त्यांनी आपले आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे. मात्र न्याय न मिळाल्यास आंदोलन आणखी तीव्र केले जाईल असा इशारा शेतकऱ्यांनी दिला. उपोषणार्थींमध्ये आदिनाथ अशोकराव गोरे, विष्णु सोपानराव गोरे, एकनाथ ज्ञानोबा अवचार, अशोक बाबुराव गोरे यांच्यासह शेकडो शेतकऱ्यांचा सहभाग आहे. यावेळी पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचा सहायक अभियांत्री लाच घेताना पकडला



जालना । प्रतिनिधी

तक्रारदार यांचे सुशिक्षित बेरोजगाराचे सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक २ जालना येथून लायसन्ससाठी कागदपत्र पडताळणी साठी ४०००/-रुपये लाच स्विकारतांना कृष्णा महिंद्रकर वय ४७ वर्ष पदः स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ यांना लाच घेताना पकडण्यात आले. आरोपी कृष्णा महिंद्रकर रा. वाल्मीक नगर जालना. दि.१६/०६/२०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र २ जालना येथे आरेखक व नोंदणी शाखेत. यातील तक्रारदाराचे इंजिनियरिंग चे शिक्षण झाले असून त्यांना सुशिक्षित बेरोजगाराचे सार्वजनिक बांधकाम विभाग जालना येथून लायसन्स काढायचे असल्याने त्यांनी दि. २४/०३/२०२६ रोजी ऑनलाइन अर्ज भरला होता. त्यानंतर दि ०९/०६/२०२६ रोजी त्यांना ईमेल द्वारे सार्वजनिक बांधकाम विभाग क्र २ येथे कागदपत्र पडताळणी साठी बोलावले होते. त्यावरून तक्रारदार हे कागदपत्र पडताळणी साठी कार्यालयात गेले असता तेथील लोकसेवक कृष्णा अशोकराव महिंद्रकर, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, यांनी कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी ५०००/- रु लाचेची मागणी केली. अशा आशयाची तक्रार जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिली.

दिनाक १६/०६/२०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र २ जालना येथे आरेखक व नोंदणी शाखेत पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता यातील लोकसेवक कृष्णा अशोकराव महिंद्रकर वय ४७ वर्ष पदः स्थापत्य अभियांत्रिकी सहायक सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ जालना यांनी तक्रारदार यांना कागदपत्रांच्या पडताळणी साठी ५,०००/-रू लाचेची मागणी करून तडजोडीअंती ४,०००/-रू लाच स्विकारण्याचे कबुल केल्याचे निष्पन्न झाले. आणि पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडून ४०००/-रु लाचेची रक्कम स्वीकारुन त्यांचे टेबलचे ड्रावर मध्ये ठेवले असता त्यांना लाचलुचपत प्रतिंधक विभाग जालना चे पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांनी व त्यांच्या पथकातील अंमलदार यांनी ताब्यात घेतले. आलोसे यांची अंगझडती घेतली असता १ मोबाईल, लाचेचे ४०००/-रुपये टेबलचे ड्रावर मध्ये व इतर २,३४०/- रूपये मिळुन आले. आलोसे यांची घरझडती प्रक्रिया सुरु आहे. आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदरची कामगीरी श्रीमती माधुरी केदार कांगणे, पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, मा. श्री. शशिकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक बी.एस. जाधवर यांनी व पथकातील पोहेकों / गजानन घायवट पोअं./ गणेश चेके, अमोल चेके, चालक भालचंद्र बिनोरकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांनी केली.

# 'शिवसेना महिला तक्रार निवारण केंद्र' व संपर्क कार्यालयाचे बोराडे यांच्या हस्ते उद्घाटन

मंठा । प्रतिनिधी

महिलांच्या अडीअडचणी व तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी मंठा शहरात 'शिवसेना महिला तक्रार निवारण केंद्र' आणि जनसंपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून तालुक्यातील महिलांच्या विविध प्रश्नांना व समस्यांना न्याय मिळवून दिला जाणार आहे. हे कार्यालय शिवसेना नेते व मार्गदर्शक माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख ए. जे. पाटील बोराडे आणि माजी सभापती प्रल्हादराव बोराडे यांच्या खंबीर मार्गदर्शनाखाली सुरू करण्यात आले आहे. या नवीन शाखेचे अधिकृत उद्घाटन शिवसेना तालुकाप्रमुख उदयदादा बोराडे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. याप्रसंगी



महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सुनिता ताई देशमुख, गयाअक्का पवार, व सर्व तालुक्यातील महिला आघाडी

या प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करण्यात आला. मंठा येथील या नवनिर्वाचित केंद्राच्या अध्यक्षपदी श्रीमती रेखा शिरगोळे यांची नियुक्ती करण्यात आली असून, महिलांचे संघटन व त्यांच्या समस्या सोडवण्याची मुख्य जबाबदारी त्यांच्यावर असेल. महत्त्वाची माहिती व संपर्क कार्यालयाचा पत्ता शिवसेना कार्यालय, मार्केट यार्ड, मंठा, ता. मंठा, जि. जालना. संपर्क क्रमांक: ७६६६०८८८२१ (७६६६०८८८२१). आवाहन: मंठा परिसरातील महिलांनी आपल्या कोणत्याही समस्या, तक्रारी किंवा कायदेशीर मार्गदर्शनासाठी या संपर्क कार्यालयाशी किंवा थेट अध्यक्ष श्रीमती रेखा शिरगोळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे. यावेळी भगवानराव गायकवाड, सतीश राव देशमुख, बाळासाहेब देशमुख, विनोद खरात, बंडू नाना बोराडे, भगवान बोराडे, माऊली वायाळ, पप्पू बोराडे.

# दरोडेखोरांनी केलेल्या हल्ल्याने फौजीच्या आईने फोडला टाहो

## खरवंडी परिसरात वाढते सशस्त्र दरोडे व जीवघेणे हल्ले पार्श्वभूमीवर जनता भयभीत

पाथर्डी। प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील खरवंडी कासार भारजवाडी कीर्तनवाडी ढाकणवाडी टाकळीमानुर भालगाव या पट्ट्यांमध्ये दर दोन दिवसाआड सशस्त्र दरोडे व चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून ऊसतोडणी मजूर शेतकऱ्यांवर जीवघेणा हल्ला करण्यात येत असल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे ढाकणवाडी येथील जालिंदर देवराव ढाकणे या शेतकऱ्याच्या सोमवारी मध्यरात्री सशस्त्र दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला दरोडेखोरांनी सुरुवातीला जालिंदर ढाकणे यांच्या घरावर दगडफेक केली यामुळे लहान मुले भयभीत होऊन मोठ्याने रडू लागले लोकांचा जमाव गोळा झाल्याने चोरट्यांनी पळ काढला जालिंदर ढाकणे यांचा मुलगा अंबादास ढाकणे हे भारताच्या सैन्यदलामध्ये जम्मू काश्मीर येथे कार्यरत असून देशसेवा करणाऱ्या फौजीच्या घरावर दरोडा पडल्याने त्यांच्या मातोश्री भिमाबाई ढाकणे यांनी दरोडेखोरांकडून जीवितास धोका असल्याने टाहो फोडला असून पोलीस प्रशासनाने खरवंडी कासार पोलीस चौकी २४ तास कार्यान्वित करून पोलीस संरक्षण देण्याची मागणी ढाकणवाडीचे उपसरपंच सुनील ढाकणे यांनी केली आली आहे.

# जि. प. प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात

जालना। प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिंधी काळेगाव येथे प्रवेशोत्सवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमासाठी उप जिल्हाधिकारी श्रीमती मनिषा दांडगे, शिक्षण विस्तार अधिकारी डॉ.भरत वानखेडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्रीमती शांताताई गजानन गिराम,शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष सुभाष गिराम,सरपंच सुभाष गिराम, विष्णुपंत गिराम,उप सरपंच, रामभाऊ मोहिते, सीताताई मोहिते,गावकरी,उर्दू शाळेचे उपाध्यक्ष शौकतभाई, दिलीप जोगदंड, शेख इब्राहिम, दगडू गिराम, कमलाकर जोगदंड, जिजा वाजे, मोहम्मद शेख, मुस्ताक मौलाना,बाबासाहेब गिराम, आयुबभाई यांची उपस्थिती होती.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यातआले. सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक बबनराव बोरुडे यांनी



केले . यावेळी बोलताना उपजिल्हाधिकारी श्रीमती मनिषा दांडगे म्हणाल्या की ,ग्रामीण भागातील मुलांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन करिअरच्या वेगवेगळया संधी शोधाव्यात. त्यांनी यावेळी शाळेत राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती करून घेतली व त्याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच त्यांच्या हस्ते शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रांचलन श्री.गिरी तर आभार प्रदर्शन अशपाक यांनी केले.या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक बबनराव बोरुडे , राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक रामेश्वर आंबेकर, रामा गिरी, विजय सदावर्ते, मिसाळ, ढेंगळे, उर्दू माध्यमाचे मुख्याध्यापक आश्पाक, महाजन मॅडम, तळेकर मॅडम, राठोड मॅडम, खरात मॅडम राऊत मॅडम, पवार सर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी होण्यासाठी परिक्षम घेतले.

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय (दंड - विभाग )**

ता. आष्टी जि. बीड

Email id-tahsildarashti@gmail.com

दूरध्वनी. क्र.. (०२४४१) २८२५४२

क्र.२०२६/दंड. विभाग/जन्म-मृत्यू/कावी-

दि.१४/०५/२०२६

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे ता.ब्रम्हगाव जि, बीड यांना जाहीर केले जाते की अर्जदार नामे दादासाहेब भाऊसाहेब गवारे रा ब्रम्हगाव ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांच्या नामे, शिवम दादासाहेब गवारे रा ब्रम्हगाव ता. आष्टी जि.बीड याची जन्म/मृत्यू दि. २८/०२/२००५ रोजी मोजे. ब्रम्हगाव ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अजंद्वारास सदरहू जन्म/मृत्यूत्ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदारावे यांची स्वतः यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म/मृत्यू नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. १५/०५/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत /-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी

# पत्रकार अमानुष मारहाण प्रकरण

## भ्रष्ट पीएसआय संदीप ढाकणे व विलास जाधव यांना निलंबित करण्याची मागणी!

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील भगवानगड परिसर प्रेस क्लबचे अध्यक्ष व पत्रकार प्रा.दादासाहेब खेडकर हे खरवंडी कासार येथे बारावी बोर्डाची परीक्षा सुरू असताना वार्तांकन करण्यासाठी जवळवाडी रोड येथील संत भगवानबाबा उच्च माध्यमिक विद्यालयाकडे जात असताना बारावीच्या पहिल्या इंग्रजीच्या पेपरला छत्रपती संभाजीनगर पुणे मुंबई बीड जालना अशा पाच ते सात जिल्ह्यातून बाहेरील विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झालेले असल्याने पालकांची तुफान गर्दी होती ट्राफिक जाम झाल्याने आणि पालकांचा मोठा जमाव असल्याने गर्दीतून गाडी काढणे शक्य नव्हते अशा परिस्थितीत पालकांना परीक्षा केंद्र बाहेर पाचशे मीटरच्या आत न येऊ देणे व ट्राफिक अशा दुहेरी परिस्थितीत पोलीस बंदोबस्त सांभाळणारे पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे व विलास जाधव याने पत्रकार दादासाहेब खेडकर यांना अमानुष मारहाण केली आणि नायब तहसीलदार किशोर सानप यानी खोटी फिर्याद देऊन खोटे गुन्हे दाखल केले अमानुष मारहाण झाल्याने दादासाहेब खेडकर हे आठ दिवस गंभीर दुखापतग्रस्त होते त्यांनी उपजिल्हा रुग्णालय पाथर्डी खरवंडी कासार प्राथमिक आरोग्य केंद्र व खाजगी रुग्णालयात उपचार घेऊन अहिल्यानगर पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना भगवानगड परिसर प्रेस क्लब पत्रकार संघटनेच्या वतीने लेखी निवेदन देऊन पोलीस उपनिरीक्षक संदीप ढाकणे व विलास जाधव यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची व पत्रकाराला अमानुष मारहाण करत मानवी हक्कांचे उल्लंघन करणे आणि कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी निलंबनाची मागणी केली आहे तशा स्वरूपाचा लेखी अर्ज पोलीस तक्रार प्राधिकरण नाशिक मानवअधिकार विभाग यांच्याकडे केला आहे.

ढाकणे व जाधव हे दोन्ही पीएसआय अवैध धंद्यावाल्यांचे रखेल आहेत दरोडेखोर मटका जुगार बिंगो बनावट दारू विक्रेते यांच्याकडून लाखो रुपयांचे हप्ते घेणारे आणि माझ्यावर खोटी फिर्याद देऊन खोटे गुन्हे दाखल करणारे भ्रष्ट नायब तहसीलदार किशोर सानप यांची बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यातील कारकीर्द व नेवासा तालुक्यातील कारकीर्द सर्वश्रुत आहे वाळू तस्करांकडून करोडो रुपयांची माया या महाशयांनी गोळा केली आहे तीन वेळा अँटी करप्शनच्या सापळ्यात अडकलेले व अंडरपॅन्टवर पळून जाण्यात यशस्वी ठरलेले किशोर सानप भ्रष्ट पीएसआय संदीप ढाकणे व विलास जाधव यांचा काळा चिट्ठा लवकरच उघड करणार असल्याचेही दादासाहेब खेडकर यांनी सांगितले.

चौकट- विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण नाशिक कार्यालयाकडे मी तक्रार दिली होती माझा जबाब उपविभागीय अधिकारी नीरज राजगुरू यांनी एसपी कार्यालयकडे पाठवला असून भ्रष्ट अधिकारी ढाकणे व जाधव यांनी खोटे जबाब नोंदवले असून मी पत्रकार नसल्याचा दावा दोघे करत आहेत गेल्या दहा वर्षापासून मी पाथर्डी तालुक्यात पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत आहे मी व्यसन करतो असा त्यांचा आरोप आहे या आरोपांचे मी खंडन करत असून माझ्या वैयक्तिक चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याचा अधिकार जाधव आणि ढाकणे यांना नाही यांना कायद्याच्या चक्रव्यूहमध्ये भेदल्याशिवाय स्वस्त बसणार नाही .

प्रा.दादासाहेब खेडकर (अध्यक्ष भगवानगड परिसर प्रेस क्लब )

# खरेदी-विक्री संघाच्या माजी अध्यक्षांच्या घरासमोरील उपोषणकर्त्यांवर खंडणीचा गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

येथील खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष दिपक जाधव यांच्या घरासमोर आर्थिक वादातुन उपोषण बसलेल्या चौघांविरुद्ध खरेदी विक्री संघांच्या माजी अध्यक्ष दिपक जाधव यांच्या मुलाच्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दि १६ जुन मंगळवार रोजी ५० लाखांची खंडणी मागितल्या प्रकरणी खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष दिपक जाधव यांचा मुलगा सौरभ दिपकराव जाधव वय ३२ वर्षे व्यवसाय शेती व शासकिय कॉन्टॅक्टर,रा.स्वामी विवेकानंद नगर माजलगाव यांनी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली कि,वरिल ठिकाणचा राहणार असुन घरी आई आर्चना वडील दिपकराव पत्नी नम्रता भाऊ अभिषेक असे राहत असुन शेती करुन कुटुंबाची उर्पाजविका भागवतो.दि १५ जुन २०२६ रोजी माझे वडिल दिपक जगन्नाथराव जाधव,भाऊ आभिषेक दिपकराव जाधव आई अर्चना दिपकराव जाधव आसे आम्ही सर्व घरी असताना आमचे राहते घरासमोर सकाळी १०:३० वाजण्याच्या दरम्यान नवनाथ गनपत पवार,वर्षा नवनाथ पवार,गणपत बेलाजी पवार,बायजाबाई गणपत पवार सर्व रा.वारोळा तांडा ता.माजलगाव जात बंजारा.हे सर्वजण आमच्या घराच्या भींतीवर उपोषणाचा बोर्ड लावुन कुठलीही परवानगी न घेता बेकायदेशीररित्या उपोषणाला बसुन त्यांचा आणि आमचा यापुर्वी कुठलाही व्याव्हारिक संबंध नसताना मला असे म्हणाले कि,तु मला ५० लाख रुपये खंडणी दे नसता तुझ्या घरात घुसुन तुझ्या घरातील सर्वांना जिवे मारुन टाकुत व तुमच्या घरातील कोणीही व्यक्ती घरातुन बाहेर निघाल्यास त्याच्या अंगावर पेट्रोल टाकुन पेटऊन देऊत.असे म्हणुन फिर्यादीला म्हणाला कि हिं ५० लाख रुपयाची खंडणीची रक्कम न दिल्यास तुमच्या घरातील व्यक्तीच्या नावाने चिट्टी लिहुन तुमच्या दारात विष पिऊन किंवा फाशी घेऊन,पेट्रोल स्वताच्या अंगावर टाकुन घेऊन आम्ही आत्महत्या करु आशा धमक्या आम्हा घरातील सर्वांना देऊन यातील नवनाथ गणपत पवार,वर्षा नवनाथ पवार, गणपत बेलाजी पवार,बायजाबाई गणपत पवार यांनी ५० लाख रुपये खंडणीची मागणी करुन व जिवे मारुन टाकुत अशा धमक्या दिल्या आहेत म्हणुन माझी वरिल लोकांविरुध्त दिलेल्या फिर्यादीवरून माजलगाव शहर पोलीस ठाण्यात नवनाथ गणपत पवार,वर्षा नवनाथ पवार,गणपत बेलाजी पवार व बायजाबाई गणपत पवार यांच्या विरोधात गु.र.नं ०२०३/२०२६ भारतीय दंड संहिता कलम ३०८ (३),३०८(३),३५१ (२),३५२,३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल के.के.जायभाय हे करत आहेत.



# फी थकली म्हणून विद्यार्थ्याचा टीसी रोखला बीडमधील ट्विंकलिंग स्टार स्कूलचा प्रताप

## शिक्षण विभागाकडे तक्रार; कारवाई न झाल्यास शिवसेनेचा आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

शहरातील टिंकलिंग स्टार स्कूलमध्ये इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याची थकीत फी भरली नाही म्हणून शाळेने त्याचा शाळा सोडल्याचा दाखला (टीसी) रोखून धरल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या मनमानी कारभारामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भीती निर्माण झाली असून, याप्रकरणी शिवसेना बीड शहरप्रमुख गजानन कदम यांनी शिक्षण विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तसेच संबंधित शाळेवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

> ''शिक्षण विभागाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून दोषींवर प्रशासकीय कारवाई करावी. विद्यार्थ्याला त्वरित टीसी न मिळाल्यास शिवसेनेच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.''
>
> श्री. गजानन कदम (शहरप्रमुख, शिवसेना, बीड)

**आर्थिक परिस्थितीमुळे शाळा बदलण्याचा निर्णय**

मिळालेल्या माहितीनुसार, भार्गव नितीन खुरणे हा विद्यार्थी टिंकलिंग स्टार स्कूलमध्ये पाचवीत शिक्षण घेत आहे. त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत प्रतिकूल आहे. शाळेची वार्षिक फी सुमारे २८,००० रुपये असून, पालकांनी त्यापैकी १५,००० रुपये आधीच जमा केले आहेत. मात्र, उर्वरित १३,००० रुपये आणि लेट फीचे २,००० रुपये असे एकूण १५,००० रुपये भरणे पालकांना शक्य होत नव्हते. त्यामुळे त्यांनी मुलाचा प्रवेश दुसऱ्या शाळेत घेण्याचा निर्णय घेतला.

**दंडासह पूर्ण फीसाठी शाळा प्रशासनाचा अट्टाहास**

पालकांनी मुलाच्या पुढील प्रवेशासाठी शाळेकडे टीसी (दाखला) ◀◀ पान ३ वर

# नेकनुर प्रकरणात आ.जगताप व आ.लांडगे यांच्यावर कारवाई करा-ॲड.शेख शफीक

नेकनूर । प्रतिनिधी

एमआयएमचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफीक भाऊ यांनी सोमवारी नेकनूर येथे भेट देत संघटनात्मक बांधणी, सामाजिक उपक्रम आणि प्रलंबित तक्रारींच्या पाठपुराव्याचा आढावा घेतला. यावेळी एमआयएम चे जिल्हा परिषद सर्कल अध्यक्ष अन्वर हाशमी, नेकनूरची बुलंद आवाज म्हणून ओळख असलेले अमजद पाशा, नव्याने नियुक्त करण्यात आलेले प्रभारी शहराध्यक्ष शेख वसीम भाई, तसेच शकील कारभारी, नसीर कारभारी, अब्दुल रहमान (राजू), शेख जुनेद, शेख आमिर आणि बशीर तांबोळी शेख वाजेद यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते व युवक उपस्थित होते.



हाशमी फार्म हाऊस येथे आयोजित कार्यक्रमात नव्याने प्रभारी शहराध्यक्षपदी नियुक्त झालेल्या शेख वसीम भाई यांचा सत्कार करून त्यांच्याकडे शहर संघटनेची जबाबदारी सोपविण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनीएमआयएम अधिक बळकट करण्यासाठी आणि समाजहिताचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान नेकनूरमध्ये एमआयएम च्या वतीने सुरू असलेल्या मोफत पाणी टँकर उपक्रमाचा विशेष गौरव करण्यात आला. पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सर्व समाजातील नागरिकांना निःशुल्क पाणी उपलब्ध करून देणाऱ्या एमआयएम चे शेख जुनेद, शेख आमिर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले. समाजसेवेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या मदतीसाठी उभे राहणाऱ्या कार्यकर्त्यांचा हा सन्मान असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

ॲड शेख शफीक भाऊ यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नेकनूर पोलीस स्टेशनला भेट देऊन पोलीस निरीक्षकांची भेट घेतली. नुकत्याच झालेल्या जनआक्रोश मोर्चादरम्यान करण्यात आलेल्या कथित द्वेषपूर्ण, धार्मिक भावना भडकावणाऱ्या आणि समाजात तेढ निर्माण करणाऱ्या भाषणांबाबत यापूर्वी सादर केलेल्या तक्रारीचा पाठपुरावा करण्यात आला. शिष्टमंडळाने सांगितले की, आमदार संग्राम जगताप आणि ◀◀ पान ३ वर

# दुहेरी गुन्ह्यातील फरार आरोपी गेवराईत जेरबंद

गेवराई । प्रतिनिधी

जिवे मारण्याचा प्रयत्न (कलम १०९) आणि गंभीर दुखापत करण्यासह दुहेरी गंभीर गुन्ह्यांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून फरार असलेल्या एका सराईत आरोपीला गेवराई पोलिसांनी नवीन बसस्थानक परिसरातील गर्दीतून मोठ्या चातुर्याने अटक केली. धनंजय नारायण सरक (वय २९, रा. बागपिंपळगाव, ता. गेवराई) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

आरोपी धनंजय सरक याच्याविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ३३६/२०२६ आणि २८७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, गंभीर दुखापत करणे व धमकावणे अशा विविध कलमांखाली दुहेरी गुन्हे दाखल आहेत. गुन्हे दाखल झाल्यापासून तो पोलिसांना सतत गुंगारा देत होता.

**बसस्थानकावरून पळण्याच्या तयारीत असताना पडली झडप**

हा फरार आरोपी गेवराई शहरात येत असल्याची खात्रीशीर माहिती पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना गुप्त बातमीदाराकडून मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ हालचाली करत शहरातील नवीन बसस्थानक परिसरात सापळा रचला. रात्री ८:३० वाजण्याच्या सुमारास आरोपी धनंजय हा बसस्थानकावरून बाहेर पळून जाण्याच्या तयारीत असताना, पोलिसांनी गर्दीमध्येच त्याची अचूक ओळख पटवली आणि त्याला वेढा टाकून ताब्यात घेतले. आरोपीला पोलीस ठाण्यात आणून कायदेशीर ◀◀ पान ३ वर

# वादळी वाऱ्यामुळे सौताड्यात शेतकऱ्याच्या सोलार पंपचे नुकसान

सौताडा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात झालेल्या वादळी वाऱ्यामुळे तालुक्यातील गारमाळ वस्ती येथील बळीराम एकनाथ शिंदे यांच्या सोलार पंपाच्या प्लेटचे वादळी वाऱ्याने मोठे नुकसान झाले.



पाटोदा तालुक्यामध्ये मागील आठवड्यात मोठ्या प्रमाणात वादळाने झाडे ऊन्मळून पडली. अनेक शेतकऱ्यांच्या सोलार पंपचेही मोठे नुकसान झाले. याच वादळी वाऱ्यामुळे तालुक्यातील गारमाळ वस्ती येथील बळीराम एकनाथ शिंदे या शेतकऱ्याचे सोलर पंप प्लेटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. जवळपास १६ हजार रुपये किमतीच्या प्लेट या वादळी वाऱ्यामुळे नष्ट झाल्या. याच परिसरात इतर शेतकऱ्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेकांच्या शेतातली झाडे उन्मळून पडली आहेत. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी होत आहे.

# बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची बदली; नांदेड येथे सह आयुक्तपदी नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी (गट-अ) श्री. शैलेश फडसे यांची प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने आज, १७ जून २०२६ रोजी याबाबतचा अधिकृत शासन आदेश जारी केला आहे. त्यांची आता नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयात सह आयुक्त, गट-अ या रिक्त पदावर पदस्थापना करण्यात आली आहे.

शासकीय आदेशानुसार, महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने ही बदली करण्यात आली आहे.

शैलेश फडसे यांना आज म्हणजेच १७ जून २०२६ (मध्यान्होत्तर) पासून त्यांच्या सध्याच्या मुख्याधिकारी पदावरून कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यांनी १८ जून २०२६ रोजी नवनियुक्त पदावर म्हणजेच नांदेड येथे रुजू होऊन तसा अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा, ◀◀ पान ३ वर

# इंजि. प्रवीण वारे यांना 'महाराष्ट्र आयकॉन्स २०२६' आदर्श युवा उद्योजक पुरस्कार

आष्टी । प्रतिनिधी

कष्ट, जिद्द, दूरदृष्टी आणि सामाजिक बांधिलकीच्या बळावर उद्योजकतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय ठसा उमटविणारे आष्टी तालुक्यातील बेलगाव येथील भूमिपुत्र तथा युवा उद्योजक इंजि. प्रवीण दत्तात्रय वारे यांची आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या 'महाराष्ट्र आयकॉन्स २०२६' अंतर्गत आदर्श युवा उद्योजक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.



आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने समाजातील विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना दरवर्षी 'महाराष्ट्र आयकॉन्स' पुरस्काराने गौरविण्यात येते. यावर्षी उद्योजकता क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून रोजगारनिर्मितीला चालना देणे, युवकांना प्रेरणा देणे तसेच सामाजिक उत्तरदायित्व जपत विकासकामांमध्ये सक्रिय योगदान दिल्याबद्दल इंजि. प्रवीण वारे यांच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करणाऱ्या इंजि. वारे यांनी उद्योग व्यवसायासोबतच सामाजिक क्षेत्रातही भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या असून उद्योजकतेकडे वळण्याची प्रेरणा मिळाली आहे. त्यामुळेच त्यांची निवड या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

# नेकनूर अप्पर तहसील कार्यालयात चौसाळा गाव समाविष्ट करू नये

## शासनाच्या कार्यवाहीला नागरिकांच्या हरकती

चौसाळा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नेकनूर येथे अप्पर तहसील कार्यालय नव्याने स्थापन करण्यात शासनाकडून कार्यवाही सुरू करण्यात आली आहे शासनाने चौसाळा महसूल मंडळाचा बदल न करता सदर कार्यालय नेकनूर कार्यालयाला समाविष्ट करू नये असा सूर व मागणी चौसाळा व चौसाळा मंडळातील लोकांकडून होत असून चौसाळा हे नेकनूर कडे वर्ग करण्यास तीव्र विरोध करण्यात येत आहे शासनाच्या कार्यवाहीनुसार महसूल मंडळ चौसाळा हे गाव नव्याने स्थापन होणाऱ्या नेकनूर कार्यालय समाविष्ट करण्यास शासनाच्या हालचाली आहेत नागरिकांना तालुका व जिल्हा कामासाठी बीडला जावे लागत आहे सदर हे सोयीचे आहे आता नेकनूर कार्यालय झाल्यास नागरिकांना आपल्या तालुक्याच्या कामासाठी नेकनूर येथे जाऊन पुन्हा बीडच्या कामासाठी बीडला परत जावे लागणार आहे त्यामुळे चौसाळा व चौसाळा मंडळातील नागरिकांना वृद्ध महिला यांची हालापेष्ठा व आर्थिक नुकसान होणार आहे व यासाठी पुरेसा वेळ मिळणार नाही तरी चौसाळा मंडळातील २५ गाव या निर्णयाला कडाडून विरोध करणार आहेत या निर्णयाला २५ गावच्या ग्रामपंचायत कडून हरकत घेण्यात येणार आहे असे जिल्हा परिषद सदस्य अशोक लोढा यांनी सांगितले सदर या निर्णयाला विरोध म्हणून ग्रामस्थांची तातडीने आज दिनांक १८ रोज गुरुवार दुपारी बारा वाजता चौसाळा ग्रामपंचायतचे सरपंचपती तथा सामाजिक कार्यकर्ते बाबूशेठ लोढा यांनी बैठकीचे आयोजन केले आहे सदर आयोजित केलेल्या बैठकीत चौसाळा व चौसाळा मंडलातील सरपंच व कार्यकर्ते यांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आव्हान व सामाजिक कार्यकर्ते नितीन लोढा व चौसाळ्यातील उपसरपंच अंकुशराव कळासे मोहन झोडगे सतीश जोगदंड चंद्रसेन गुंजाळ किशोर ढोकणे चेअरमन दत्तात्रय नाईकवाडे विनोद कळाशे पंजाबराव शिंदे स्थानिक पत्रकार यांनी केले आहे.

Marathwada Shikshan Prasarak Mandal's
**Swatantrya Senani Ramrao Awargaonkar Law College Beed, Dist. Beed -431122 (Maharashtra) (P.B. No.-34)**

**WALK IN INTERVIEW**

Following post are to be filled immediately on clock hour basis & Consolidated basis.

| Sr No | Name Of The Post | Subject | No. of Post | Qualification |
|---|---|---|---|---|
| 1 | Assistant Professor For Law Three Year Degree Course (UG) On Clock Hour Basis (Granted) | Law | 12 | LL.M. B+ NET/SET/ Ph.D |
| 2 | Assistant Professor For Law Five Year Degree Course On Clock Hour Basis & Full Time (Non Granted) | Law | Full Time 03<br>CHB 03 | LL.M. B+ NET/SET/ Ph.D |
| 3 | Assistant Professor For Pre-Law I[st] & II[nd] Year of Five Year Degree Course On Full Time, (Non Granted) Preference with LL.B/LL.M | General English | 1 | M.A (Eng.) B+ NET/SET/ Ph.D |
| | | Political Science | 1 | M.A (Pol. Sci.) B+ NET/SET/ Ph.D |
| | | Economics | 1 | M.A (Economics) B+ NET/SET/ Ph.D |
| | | Sociology | 1 | M.A (Sociology) B+ NET/SET/ Ph.D |
| 4 | Full Time Assistant Professor Exclusive For Law Post Graduate(LL.M) (Non Granted) | Law | 2 | LL.M B+ NET/SET/ Ph.D |
| 5 | Diploma In Taxation Law (Non Granted) | D.T.L. | 2 | C.A/ ICWA |

**All eligible candidates are required to walk in interview on.....**

**Notice:** -1. Preference will be given NET/SET/PhD qualified candidates.
2. Candidates must remain present with original document along with two sets Xerox copies on the date of interview.
3. No T.A & D.A will be paid to candidates who are attending walk-in interview.
4.In case of non availability of the candidates as per UGC, candidates having LLM B+ may be considered & Consolidated salary will be given to LL.M Selected faculty.

**Place: - Swatantrya Senani Ramrao Awargaonkar Law College Beed.**
**Contact No. : - 8087581987**

**Date of Interview: -20.06.2026 Time: -11:00 am**

Hon'ble Prakash Sundarrao Solanke
President
M.S.P. Mandal Chh. Sambhajinagar

Hon'ble Satish Bhanudasrao Chavan
Secretary
M.S.P. Mandal Chh. Sambhajinagar

Hon'ble Rajendra Sahebrao Jagtap
Head Member/Chairman
C.D.C.
S. S.R.A. Law College Beed

Dr. Shaikh Anisur Rahaman
I/c Principal
S. S.R.A. Law College Beed

# बीड एलसीबीची कामगिरी; दोन घरफोडीतील सराईत चोरटा जेरबंद

बीड । प्रतिनिधी

शहरात बंद घरे लक्ष्य करून घरफोडी करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला गजाआड करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून बीड शहरातील दोन मोठे घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले असून, त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. कलीम अलीम शेख (वय ३२, रा. दहीफळ, ता. जि. बीड) असे अटक केलेल्या सराईत आरोपीचे नाव आहे.

**बंद घर फोडून केला होता डल्ला**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एक कुटुंब ९ जून २०२६ रोजी आपल्या घराला कुलूप लावून बाहेरगावी गेले होते. याचा फायदा घेऊन अज्ञात चोराने बंद घराचे कडी-कोंडा तोडून कपाटातील सोने आणि रोख रक्कम लंपास केली होती. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. १५५/२०२६ कलम ३३१ (३) (४) बी.एन.एस. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखा आणि शिवाजीनगर पोलिसांनी संयुक्तपणे या प्रकरणाचा समांतर तपास सुरू केला होता.

**सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषणाने लागला सुगावा**

तपासादरम्यान पोलीस पथकाने घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषण केले. याद्वारे हा गुन्हा दहीफळ येथील कलीम अलीम शेख यानेच केल्याचे निष्पन्न झाले. तेव्हापासून पोलीस त्याच्या मागावर होते, मात्र तो सतत पोलिसांना गुंगारा देत होता.

**नाळवंडी नाक्यावर पोलिसांनी आवळल्या मुसक्या**

१५ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, संशयित आरोपी कलीम शेख हा शहरातील नाळवंडी नाका भागात कोणाची तरी वाट पाहत थांबला आहे. माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून अत्यंत शिताफीने त्याला झडप घालून ताब्यात घेतले.

पोलिसी खाक्या दाखवताच त्याने शिवाजीनगर भागातील घरफोडीची कबुली दिली. अधिक चौकशी केली असता, त्याने बीड शहरातील हिना नगर भागातही एक बंद घर फोडल्याचे कबूल केले. पोलीस ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here. Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske (mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26